
# श्री साईलीला



बाबा बसाप्पाला ( बेडूक ) वीरभद्रापासून ( साप ) वाचवितात



मे ६० पैसे १९७५

# अनुक्रमणिका – मे १९७५


| | | |
|---|---|---|
| १ संपादकीय | — | धर्मसंस्थापक आद्य श्रीशंकराचार्य |
| २ फॉजेट स्ट्रीट येथील श्रीसाईमंदिर | — | श्री. चन्द्रकांत सामन्त |
| ३ गाठीभेटी– श्री. डी. डी. नेरॉय | — | सदानंद चेन्दवणकर |
| ४ मानवी मन–दोन पैलू | — | श्री. म. धों. कुंभकर्ण |
| ५ भगवान परशुराम | — | सदानंद चेन्दवणकर |
| ६ वाऱ्यावरचे विचार | — | श्री. द. शं. टिपणीस |
| ७ ज्योतिषशास्त्राचा ओनामा | — | होरालंकार श्री. शं. बा. देवधर |
| ८ श्रीसाईनाथ चरित्र | — | श्री. र. श्री. पुजारी |
| ९ श्रीसाईबाबा | — | सौ. माधुरी कुलकर्णी |
| १० श्रीसाईस्तुती | — | श्री. अरुण पुजारी |
| ११ साईलीला सत्य | — | श्री. विजय हजारे |
| १२ राऊळ गाठीन खास | — | लक्ष्मीतनया |
| १३ ॐ साईबाबा | — | श्री. वसंत मनोरे |
| १४ साई पूजन | — | सौ. मंगला जावळे |
| १५ मनोरथ | — | सौ. मीना खाडिलकर |
| १६ श्रीसाईचा गोड सहवास | — | श्री. शाम जुवळे |
| १७ श्रीसाईनाम नौका | — | सौ. विमलादेवी |
| १८ इंद्रायणी माय | — | श्री. तु. नाईक |
| १९ गा रे साईनाम | — | श्री. जयंत भिडे |
| २० दीनांचा कैवारी | — | श्रीराम बाळकृष्ण आठवले |
| २१ नामे विविध धारी | — | श्री. श्रीधर प्रभुणे |
| २२ स्वप्नीचे साईनाथ | — | श्री. स्नेहल रा. गुप्ते |
| २३ शिरडीवृत्त | — | |
| २४ साक्षात्काराची ओळख | — | श्री. बाळकृष्ण धामणकर |

जगा लावावे सत्पथीं । हेचि साईलीलेची कृति ॥



# श्री साई वाक्सुधा

लोभाशीं ब्रह्माचें अखंड वैर । तेथें ध्याना नाहीं अवसर ।
कैंची मुक्ति विरक्ती साचार । आचार भ्रष्ट लोभिष्ट ॥ ६९ ॥
लोभा ठायीं नसे शांति । ना समाधान ना निश्चिंती ।
एक लोभ वसतां चित्तीं । जाती मातींत साधनें ॥ ७० ॥
श्रुतिस्मृतीस अविहित । ऐसें निषिद्ध जें दुश्चरित ।
त्यांतचि सदैव जो आसक्त । असमाहित चित्त तो ॥ ७१ ॥
तया नांव 'विक्षिप्त चित्त' । सदैव दुष्कर्मीं व्यावृत्त ।
अखंड विषय कर्दमीं लोळत । हिताहित देखेना ॥ ७२ ॥
हो कां ब्रह्मविज्ञानसंपन्न । नाहीं जो फलेच्छेसी निर्विण्ण ।
तोंवरी वाव तें ब्रह्मविज्ञान । आत्मसंपन्न नाहीं तो ॥ ७३ ॥

श्रीसाईसच्चरित-अध्याय १७ वा

---


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५४ वे ] मे १९७५ [ अंक २



: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, एम्. ए. पी. एच्‌डी., रा. भा. प्रवीण
- श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्सी., एस. टी. सी., रा. भा. प्रवीण



वार्षिक वर्गणी रु. ६-०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक रु. ०-६० फक्त.

*

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

संपादकीय—

# धर्मसंस्थापक आद्य श्रीशंकराचार्य

येत्या १६ मे रोजी धर्मसंस्थापक आद्य श्री शंकराचार्य यांची जयंती साजरी केली जाईल. शके ७१० व्या वैशाख शु. १० रोजी अवघ्या ३२ वर्षांच्या आयुष्यात आसेतुहिमाचल दिग्विजय करून धर्मसंस्थापना करणारे अद्वितीय पुरुष आद्य श्रीशंकराचार्यांचा जन्म झाला.

शंकराचार्य हे मलबारमधील एका नंबुद्री ब्राह्मणाच्या कुलात जन्मले. त्यांच्या आजोबाचे नाव विद्याधिराज असून ते स्वतः, वडील शिवगुरू व आई आर्यांबा असे सर्व जण कालटी येथे रहात असत. हा गाव कोचीन संस्थानात पेरियर नदीच्या काठी असून त्याच्याभोवती गर्द-वृक्षराजी आहे. ५ व्या वर्षी मुंज, वेदाध्ययन, पूर्णा नदीत सुसरीने पाय धरल्याच्या निमित्ताने आईकडून संन्यासग्रहणाची परवानगी, दहाव्या वर्षी नर्मदातीर ओंकारक्षेत्री गुरु गोविंदयतींच्याकडून संन्यासग्रहण, चार वर्षे बद्रिकाश्रमी तपश्चर्या, १६ व्या वर्षी काशीक्षेत्री शांकरभाष्याची रचना; माहिष्मती येथे मंडनमिश्रादिकांचा वादात पराभव, शृंगेरीस शारदा-मठ स्थापना, भरतखंडभर दिग्विजय, काश्मीरात सरस्वतीमठावर आरोहण, शृंगेरीमठावर सुरेश्वराचार्यांची स्थापना, कांची येथे कामाक्षी देवीची स्थापना व तेथेच वै. शु. १५ गुहाप्रवेश, असा आचार्यांचा संक्षिप्त जीवनक्रम आहे.

भारतात बुद्ध-जैन धर्मांचा उदय झाल्यापासून उपनिषदातील ब्रह्मविद्येचा लोप झाला होता. त्या ब्रह्मविद्येचा उद्धार स्वामींनी केला. शंकराचार्यांनी लोकांसाठी धर्मज्ञानाची पाणपोई घातली हे त्यांचे मोठेच धर्मकृत्य होते. दुर्लभ ब्रह्मज्ञान त्यांनी सुलभ केले. ब्रह्मसूत्रे व भगवद्गीता यांवरील त्यांची भाष्ये प्रसिद्ध असून ईश, केन, कठ, प्रश्न, मंडूक, मांडुक्य, इ. १२ उपनिषदांवरील त्यांच्या भाष्यामुळे 'आचार्य' ही पदवी सार्थ झाली. त्यांच्या स्तोत्रांतून भक्तिजिव्हाळा दिसून येतो. अद्वैत ब्रह्मज्ञान व कोमल भक्ति यांचा मधुर संगम आचार्यांच्या स्तोत्रातून झालेला आढळतो. त्यांचा अद्वैतबोध रुक्ष व नीरस नाही तर तो भक्तिने आर्द्र झालेला आहे. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः' या श्लोकार्धात श्रीशंकराचार्यांचे सारे तत्त्वज्ञान भरून राहिले आहे.

## श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने : ९ :

# फॉर्जेट स्ट्रीट येथील श्रीसाईमंदिर

**लेः श्री. चंद्रकांत दामोदर सामंत**

**श्री** साईबाबांनी आपल्या हयातीत शिरडी येथील वास्तव्यात भक्तमंडळींना असंख्य सूक्ष्म तसेच गाढ चमत्कार अनुभवास आणून दिले. त्यांच्या निर्वाणाला ५६ वर्षे लोटली तरी त्या अनुभवांची तीव्रता व जाणीव अद्यापही श्रद्धाळू भक्तांना वारंवार प्रत्ययास येत आहे आणि ह्यात तिळमात्रही अतिशयोक्ति नाही, कारण खुद्द श्री बाबांनीच स्वतः त्या विषयीची ग्वाही दिली होती.

श्रीसाईबाबा हे अद्यापही न सुटलेले कोडेच आहे. त्यांच्या लौकिक माता-पितरांचा वा बाळपणीचा थांगपत्ता जसा लागला नाही, तसा त्यांचा दैनंदिन वा प्रासंगिक वागणुकीचा व आचरणाचा यथायोग्य अर्थही कोणास लावता आला नाही. सदैव शांतस्वरूपात लोकांना दर्शन देणारे, त्यांच्याशी मृदुभाषेत बोलणारे, थट्टामस्करी करणारे श्रीबाबा वेळप्रसंगी असा रुद्रावतार धारण करीत की पाहणाऱ्यांच्या जीवाचा थरकाप होई. अधूनमधून गहन विषयावर जवळच्या भक्तमंडळींबरोबर चर्चा करणारे श्री बाबा क्वचित प्रसंगी श्रीकृष्णाप्रमाणे बाललीलाही करीत. त्यांचे आचरण फकीराचे व व्रत भिक्षेचे असले तरी त्यांचा दानधर्म कुबेराला लाजविण्यासारखा होता. त्यांचा वेष व शब्दोच्चार मुसलमानी पद्धतीचे असुनही मशिदित भक्तांकडून ते हिन्दूंच्या रिवाजाप्रमाणे षोडशोपचारे पूजाअर्चा करवून घेत. भक्तकल्याणार्थ अशक्य व अतर्क्य वाटणाऱ्या गोष्टी वाटेल तेव्हा घडवून आणणारे श्रीसाईबाबा सर्व गोष्टींचे श्रेय मात्र स्वतःकडे न घेता अल्लामियाला देत !

श्रीसाईनाथांच्या वरील अगम्य वैयक्तिक वर्णनाला लागू पडेल असे त्यांचे एक मंदिर मुंबईत फार पूर्वीपासून आहे. ताडदेव विभागातील फॉर्जेट स्ट्रीट ह्या रस्त्यावर हे प्रसिद्ध मंदिर हाजी महंमद कासम ह्या नावाच्या बिल्डिंगमध्ये वसलेले आहे. सदर इमारतीत शिरल्यावर तळमजल्यालाच डाव्या हाताला हे मंदिर लागते. मंदिराच्या दरवाजात उभे राहिल्यावर समोरच उच्चासनावर विराजमान झालेली श्री बाबांची प्रसन्न मूर्ति दृष्टीस पडते. हा पुतळा प्लास्टरचा असून अदमासे चार फूट उंचीचा आहे व एका भरभक्कम लाकडी स्टँडवर आधारित असलेल्या लाकडी मखरात त्या पुतळ्याची स्थापना केलेली आहे. यामुळेच की काय श्री बाबा सजविलेल्या एखाद्या अंबारीतच बसले आहेत असा प्रथमदर्शनी भास होतो. उजव्या हाताला असलेल्या जागेत भिंतीलगत श्रीबाबांचा, भक्तमंडळींनी अर्पण केलेला एक दुसरा बसलेला पुतळा असून त्यांच्या बाजूला, ज्यांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने ह्या मंदिराची स्थापना झाली त्या पुरुषाचा—योगिराज दत्तदास माडियेमहाराज ह्यांचा पुतळा आहे.

श्री माडियेमहाराज—पूर्वाश्रमीचे श्री. रामचंद्र रावजी माडिये हे मंदिराचे श्री. गुरुनाथ मयेकर ह्यांचे सख्खे मामा. श्री माडिये महाराज हे एक थोर साक्षात्कारी पुरुष होऊन गेले. ते श्रीसाईबाबा व श्री साटम महाराज ह्यांचे समकालीन होते. श्री साईबाबांच्या सान्निध्यात येण्यापूर्वी ते हुबळी येथे श्री सिद्धारूढ स्वामींकडे गेले असता स्वामींनी त्यांना शिरडीस श्री बाबांकडे पाठवून दिले. महाराजांनी श्रीसाई-बाबांच्या सहवासात बराच काळ घालविला. पुढे ते मुंबईस स्थायिक झाले व तेथेच त्यांनी १९४६ साली वयाच्या ७३ व्या वर्षी देह ठेवला. कोकणात कुडाळनजीक कैलकट्टा येथे त्यांची समाधि आहे. त्यांच्याकडून अनुग्रह घेतलेली व त्यांच्या अलौ-कीक दैवी सामर्थ्यांचा अनुभव घेतलेली अनेक माणसे अद्यापही आहेत.

श्री माडिये महाराजांच्या भगिनी व श्रीगुरुनाथ मयेकरांच्या मातोश्री कै. जनाबाई ह्या थोर साईभक्त होत्या व त्यांचाच वारसा श्री. मयेकर पुढे चालवित आहेत. श्री. मयेकर ह्यांचा मोटारचा व्यवसाय असून वरळी, हेन्स रोड येथे त्यांचे "जनरल ऑटो वर्क्स" ह्या नावाचे गॅरेज आहे. व्यवसायाव्यतिरिक्त उरलेला वेळ श्रीसाईसेवेत घालवितात. श्री साईभक्ती व सेवा हेच त्यांचे वेड आहे व त्याचे श्रेय ते आपल्या मामांना व मातोश्रींना देतात.

फॉजेंट स्ट्रीट वरील श्रीसाईमंदिर हे सुरुवातीस १९१९ साली स्थापन झाले. प्रथमतः ते त्याच रस्त्यावरील एका समोरच्या इमारतीत होते व १९४२ साली त्याची स्थापना सध्याच्या जागेत झाली. केवळ चौदा फूट लांब व दहा फूट रुंद एवढ्या जागेत सामावलेले हे मंदिर फार प्रसिद्ध असून अनेक थोर संत, पुढारी, सर्वच क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ति, अधिकारी वर्ग ह्या मंदिराला नेहमी भेट देत असतात. नुकतेच शिर्डी संस्थानचे माननीय कोर्ट रिसिव्हर श्री. पाठकसाहेब हे मंदिर बघून गेले. त्याचप्रमाणे गणेशपुरीचे श्रीमुक्तानंद स्वामी, साकोरीच्या पुज्य गोदावरीमाता ह्यांनीही मंदिरात येऊन श्री बाबांचे दर्शन घेतले. आश्चर्याची गोष्ट ही की मंदिराची जागा अतिशय लहान असून व ते खाजगी असूनही अक्षरशः लाखो लोकांची गर्दी तेथे उसळत असते. जागेच्या टंचाईमुळे इतर श्रीसाई मंदिराप्रमाणे येथे सांजसकाळ-च्या आरत्या, कीर्तन, भजन वा प्रवचने आयोजित करणे इच्छा असूनही शक्य होत नाही. तरीसुद्धा केवळ श्रद्धायुक्त अंतःकरणाने आजूबाजूच्या व लांबवरच्या परिसरा-तील भक्तजणांची तेथे जमत असलेली गर्दी पाहून मन थक्क होऊन जाते. श्रीदत्तदास माडियेमहाराजांच्या वास्तव्याने व आशीर्वादाने पुनीत झालेल्या ह्या श्रीसाईमंदिराला आमचे प्रणाम.

गाठीभेटी—१०

## श्रीसाईबाबांचा पहिला ठसा पाडणारे

# आमचे नेरॉयकाका

सदानंद चेंदवणकर



भगवान श्रीसाईबाबांच्या तैल-चित्राचे छायाचित्र काढून घेऊन ते चांगल्या डिझाइनमध्ये बसवून त्यांच्या त्या छायाचित्राचा पहिला ठसा-ब्लॉक तयार करण्यात एका कला-काराने सुमारे तीस वर्षांपूर्वी सुयश मिळविले आणि तेव्हापासून श्री-साईबाबांची रंगीबेरंगी छायाचित्रे ही भाविकांच्या घरोघरी पोचू लागली, देव्हाऱ्यातून पूजिली जाऊ लागली. ज्या कलाकाराने हे महान् कार्य केले त्या कलाकारांचे नाव आहे डी. डी. नेरॉय. आमच्या श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीशी त्यांचा निकटचा संबंध आहे आणि म्हणूनच की काय आम्ही त्यांना नेरॉयकाका या आपुलकीच्या व आदराच्या नावाने संबोधतो. नेरॉयकाकांना नुकतीच पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली असून शहात्तराव्या वर्षात पदार्पण केले आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभि-नंदन. आज ते मुंबापुरीतील एक विख्यात ब्लॉकमेकर आहेत. बाबांच्यावर संपूर्ण निष्ठा ठेऊनच त्यांनी आपला हा व्यवसाय नावारूपाला आणला आहे.

नेरॉयकाकांचे संपूर्ण नाव श्री. दत्ताराम द्वारकानाथ नेरॉय. त्यांचा जन्म २८ फेब्रु-वारी १९०१ रोजी मुंबईत झाला. त्यांचे वडील श्री. द्वारकानाथपंत हे मुंबईतील पहिले ब्लॉकमेकर होत ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. प्रिन्सेस स्ट्रीट काळबादेवी व नंतर गिरगावात त्यांनी आपला व्यवसाय १८९८ साली सुरू केला. आणि आपल्या वडीलांचा हा व्यवसाय, वडिलांच्या निधनानंतर (८-१२-१९२२) डी. डी. नी पहायला सुरुवात केली, ती अगदी आजतागायत.

नेरॉयकाकांचे शिक्षण मुंबईत झाले. ते साहित्य संघाजवळच असलेल्या भालेराव

मार्ग म्युनिसिपल मराठी शाळेने व तदनंतर सेंट झेवियर्स हायस्कूलचे विद्यार्थी. त्यावेळच्या त्या जमान्यातल्या मॅट्रिकपर्यंतचे त्यांचे शिक्षण झाले आहे. वडिलांच्या निधनानंतर त्यांनी आपला हा व्यवसाय हाती घेतला व त्यात त्यांनी संपूर्ण लक्ष घातले. अगदी तनमनाने. यातच त्यांनी १९४८ साली श्रीसाईबाबांचा पहिला ब्लॉक तयार केला. त्यांच्या चित्राचे डिझाइन सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सांब मोनाप्पा पंडित यांनी केले होते. तो ब्लॉक इतका अप्रतिम झाला की, याच्या सहाय्याने काढलेली श्रीबाबांची छायाचित्रे हजारोंनी हातोहात खपली गेली. या अपूर्व कामगिरीमुळेच की काय बाबांनी नेरॉयकाकांच्या स्टुडिओची भरपूर प्रगती केली. अगदी बसल्या जागेवर आजही बाबा त्यांना हजारो रुपये देत आहेत. नेरॉयकाकांचे सारे कुटुंबच्या कुटुंब साईभक्त आहे.

श्री. नेरॉय १९२३ साली जर्मनीत जाऊन आले. पुढे १९२९ ते ३१ हा काळ त्यांनी युरोपखंडाच्या प्रवासात घालविला. या दोन्ही परदेश भेटीत त्यांनी पाश्चात्य देशातील ब्लॉकमेकींगच्या व्यवसायाची व तेथल्या विकासाची जास्तीत जास्त माहिती करून घेतली व भारतात परतल्यावर आपल्या स्टुडिओचा आणखी विकास केला. श्री. नेरॉयकाकांचा विवाह १९२२ साली झाला. त्यांच्या सौभाग्यवती आनंदीबाई या पूर्वाश्रमीच्या रेळे कुटुंबातल्या. त्यांना तीन कन्या व दोन पुत्र यांची प्राप्ती झाली. काकांचे थोरले चिरंजीव श्री. भालचंद्र सध्या जर्मनीत न्यूरेन्बर्ग येथे असून ते ब्लॉक मेकींगचाच व्यवसाय तिथे करतात. धाकटे चिरंजीव श्री. सुभाष हे मुंबई येथे आपल्या वडिलांच्या व्यवसायातच लक्ष घालतात. आपल्या दोन्ही मुलांना नेरॉय काकानी या कलेत प्रविण केले आहे.

नेरॉयकाका साईभक्त आहेत. ते सात आठदा शिर्डीला जाऊन आले आहेत. १९६० सालापासून मात्र त्यांना जाणे झाले नाही. कमूबाबांच्यामुळे ते साईबाबांकडे वळले ते कायमचेच. रोज सकाळी ते गणपती, साईबाबा व आपले वडील यांचे नामस्मरण करतात व आपल्या कार्याला लागतात. आपल्याला धंद्यात दिलेली सारी मिळकत आणि बरकत बाबांनीच दिली आहे अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. आपल्या स्टुडिओतल्या एका भागात त्यांनी बाबांची एक भव्य व जंगी, चांगली लांब रुंद तसबिर बसविली असून त्या भागाला जणू मंदिराचेच स्वरूप त्यांनी दिले आहे. रात्रंदिवस नेरॉयकाका या चित्ररुपी बाबांच्याच सहवासात रममाण होत असतात. दररोज वर्तमानपत्रे व संत वाङ्मयाचे वाचन ते न चुकता करतात. संत तुकारामाची गाथा त्यांचा अत्यंत आवडता ग्रंथ आहे. साईबाबांची मनापासून सेवा करणाऱ्या नेरॉयकाकांनी शंभरावर वाढदिवस साजरे करावेत ही साईचरणी प्रार्थना. • •

# मानवी मन–दोन पैलू

श्री. भ. धों. कुंभकर्ण, नांदेड

मानव हा उताविळ प्राणी आहे. त्यात त्याला मिळालेली निसर्ग-दत्त देणगी " मन " हे काही अजबच चक्र आहे. त्याला कुणी पाहू शकत नाही. पण त्याची सत्ता किंबहूना सर्व सत्ताधिश आपणच आहोत असे मानणाऱ्या मानवाचा तो सत्ताधिश असतो, आहे.

पण मनाचा विचारच कुणी केला नाही, कारण त्या सत्ता–सर्वेश्वराने तशी कुणाला संधीच दिली नाही. तशी जर संधी दिली असती तर त्याचा प्रभाव नसता का कमी झाला ?

ज्याला मन आहे तो मानव. जो मानव मनापासून तयार झालेले मानसिक खेळ खेळतो तो माणूस. त्याला माणुसकी पण शिकावी लागते. पण त्यातच मनाचा स्वार्थी उतावीळपणा पण दडून बसलेला असतो. हे सर्व यथास्थित घडले तर त्याचा प्रभाव, त्याचे वर्चस्व कसे समजणार ?

म्हणूनच संतांची वचनावली उताविळ मनाच्या मानवासाठी प्रसिद्ध आहे.

मन उताविळ, त्याची खळबळ, करील निश्चळ तोच मानव. माणसाला मन नसते तर प्रभुलासुद्धा हा सर्व खटाटोप जगाचा, मायेचा पसारा मांडण्याची गरजच पडली नसती. पण तो सुद्धा प्रभुच्या मनाचाच खेळ आहे. त्याने मन असलेले मानव निर्माण केले व त्यांचे खेळ, स्वार्थी–निःस्वार्थीपणाचा लपंडाव व त्यातून निर्माण झालेला जगतपसारा अर्थात त्याचा माया विस्तार हा सुद्धा एक खेळच आहे. पण यात स्वतःला न ओळखणारा, मनाने सर्वांग सुंदर नटलेला मानव, त्या मायेतच स्वतःला गुरफटून घेऊन " सत्य " मनाचे बाजूने कौल न देता " असत्य " मनाचे मनोरे रचण्यात व ढासळवण्यातच गढून गेलेला आहे.

**सत्य** आणि **असत्य मन** ह्या मानवी मनाच्या दोन भिन्न संज्ञा आहेत. कोणतेही कर्म असो, मानवाला त्याच्याशी जीवनात टक्कर द्यावीच लागते, दोन हात करावेच लागतात. आणि त्यातूनच त्याला सत्य असत्याची झटापट दिसते. व निर्णय हा सर्वस्वी त्याच्या दोन मनामधील बलिष्ट कोण असेल त्याच्या बाजूने जरी होत असला, तरी हे कर्म चांगले आहे. असे त्याचे चांगले ( सत्य ) मन त्याला बजावते. उलटपक्षी हे कर्म माझ्या बाजूचे नाही, अर्थात् ते वाईटच आहे असे असत्य मन त्याला सांगते. तर हे कर्म वाईट आहे असे त्याचे चांगले मन जरी त्याला सांगत असले तरी हेच कर्म चांगले आहे, तू त्याच मार्गाने जा, असे असत्य मन त्याला बजावते. ही दोन मनांची झालेली घालमेल, झटापट, हा सर्व त्या

मानवाच्या मनाला कोणते अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. जन्मल्यापासून तो कोणत्या वातावरणात वाढला आहे व त्या वातावरणाचा त्याच्या मनावर इष्ट (सत्य) अनिष्ट (असत्य) परीणाम झालेला असणार, यावर अवलंबून असते.

उदा:–चोरी करणारा मानव; समाजाच्या मनाच्या मानाने चोरी हा गुन्हा असला तरी त्याचे मन "चोरी करणे म्हणजे वाईट कर्म नव्हे" या अधिष्ठानावर वाढलेले असल्यामुळे त्याला त्यात वाईट असे काहीच वाटत नाही, तर मी केलेले कर्म हे चांगलेच आहे. हा त्याच्या असत्य मनाच्या बाजूने पडलेला कौल, आणि सत्य मन त्या असत्य मनाच्या प्रभावाखाली दडपून गेलेले असते.

सत्य आणि असत्य मन अशा संज्ञा कोणी दिल्या आहेत. समाजामध्ये तर दोन्हीही चालतात. कधी हे वाईट तर कधी ते वाईट असा समाजाचा न्याय आहे. हे तत्व तर आपल्याला नित्य व्यवहारात प्रचितीला येतेच. तर मग हे ओळखावे कसे ? विचारावे कुणाला ? कोण सांगेल याचा मतितार्थ ?

— तर प्रभूनेसुद्धा, मानव या विचाराप्रत येऊन ठेपल्यावर त्याची सोय केलेली आहे.

सत्य आणि असत्य मनाची पडलेली भ्रांती मिटविण्यासाठी प्रभूने खास सोय केलेली आहे. आणि ती म्हणजे मानव आणि प्रभू (सत्य) यांना जोडणारा दुवा **संत.**

जोपर्यंत मानव सत्य ( प्रभू ) व असत्याचा ( माया ) विचार करणार नाही, तोपर्यंत त्याला दूव्याची सुद्धा गरज लागणार नाही. कारण तो स्वतःच निर्माण केलेल्या असत्य मनाच्या अधिष्ठानाखाली आपण सुरक्षित आहोत, असा न्यूनगंड झालेला असतो. आणि तो न्यूनगंड छेद कधी होतो, तर त्याला सत्य आणि असत्य हे दोन भिन्न प्रकार आहेत हे जेव्हा समजते तेव्हा तो सत्याच्या शोधात निघतो. आणि त्याला तो दुवा सापडतो. संत हे देखील आपल्या जवळ आलेला मानव खरोखरीच सत्याचा भुकेला आहे काय ? याचा पडताळा घेतात व सदुपदेश करतात. इतःपर त्याला सत्य आणि असत्य समजूनही तो असत्याकडेच झुकू लागला, तर त्याला नाना तऱ्हांनी, त्याची पूर्वाजित कर्मे सत्याच्या अधिष्ठानावर झालेली असतील किंवा नसतील तरी समयोचित उपदेश करून, सत्याची कास धरावयास लावतात. हेच संतांचे कार्य, हीच त्यांच्या **अवतारांची निष्पत्ती.**

अशा संत महात्म्यांपैकी श्री सद्गुरु साईबाबा, शिरडी हे एक होत. त्यांच्या हयातीत एक नव्हे तर अगणित मानवांना '**निष्ठा व सबूरी**' ह्या सदुपदेशाचा अमृत वर्षाव भोगावयास मिळाला. त्यांच्या कृतीतून, त्यांच्या वाणीतून त्यांच्या

पावलागणिक, हातवाऱ्यागणिक, अक्षय्य सुखाची प्राप्ती अनेकांनी करुन घेतली. जे आमच्या सारखे अभागी, त्यांची चरण भेट घडू न शकणारे, त्याच्यासाठी सुद्धा कविवर्य श्रीयुत दाभोळकर व श्रीयुत दासगणु महाराज व इतरांच्या सुश्राव्य, शैलीतून चरित अनुभव समाधी दर्शन लिला वर्णविल्या व आम्हाला धन्य केले, कृतकृत्य केले.

आम्ही स्वतःला अभागी फक्त चरण स्पर्श प्रत्यक्ष भेट झाली नाही, म्हणूनच म्हणवून घेऊ शकतो, अन्यथा ह्या चरित अनुभव लीला व समाधी दर्शन ऐकावयाला वाचावयाला व भोगावयाला सुद्धा भाग्यच लागते. त्यात श्री साईकृपेने आम्हाला ते अमृतकण वेचावयाला मिळाले हे आमचे केवढे तरी महद्‌भाग्य होय. त्यांनी केलेला उपदेश, "**निष्ठा व सबूरी.**" हाच उताविळ मनावर उपाय व हाच सत्य मनाचा विजय.


# श्रीसाईनाथ रोजनिशी शके १८९७

- श्री साईबाबांचे फारसे कुठेही प्रसिद्ध न झालेले अप्रतिम व संग्राह्य असे छायाचित्र.
- श्रीसाईबाबांची पादत्राणे, बाबांनी वापरलेल्या चिलीमी, आणि बाबांच्या हस्तस्पर्शाने पुनीत झालेले जाते यांची पंचरंगी आर्ट पेपरवर छापलेली मोहक चित्रे.
- श्रीसाईबाबांचे चरित्र, शिरडीत काय काय पहाल, शिरडीतील उत्सव, बाबांचे समकालीन संत, बाबांचे बोल, साईबाबांच्या सर्व आरत्या इ० संग्राहक मजकूरांनी भरलेली रोजनिशी याशिवाय बाबांच्या सहवासातील तुमची व्यक्तिगत माहिती.
- महाराष्ट्र राज्याचे नवे मुख्यमंत्री ना. शंकरराव चव्हाण यांचे शुभहस्ते शिर्डीस २३ मार्च १९७५ रोजी थाटात प्रकाशित झाली.

मोहक वेष्टन : आकर्षक छपाई

# क्षात्रतेजाने तळपणारे प्रतापी भगवान परशुराम

सदानंद चेंदवणकर

वैशाख शुद्ध तृतीयेस अक्षय्य तृतीया असे म्हणतात आणि वर्षातील साडेतीन मुहूर्तांतला तो एक मुहूर्त मानला जातो, जणू काही ॐ काराच्या साडेतीन मात्रेतील ही एक मात्राच होय असे म्हणण्यास हरकत नाही. या दिवशी जे पुण्यकर्म करावे ते अक्षय्य होते अशी कल्पना आहे. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी बुधवार व रोहिणी नक्षत्र येणे विशेष शुभकारक मानले जाते.

सर्वांत मोठे पुण्य अन्नदानाचे! पण त्याहिपेक्षा श्रेष्ठ पुण्य जलदानाचे असते. ऐन उन्हाळयात तहानलेल्या जीवाला तृषा शमविण्यास जलोदक दिले तर ते केवढे मोठे सत्कृत्य! ह्या जलकुंभदानाच्या सणाच्या दिवशी पितृपुण्यस्मृतीने अन्नदान करून जलकलश आपण दान करतो; आणि......व मगच शुभकार्यास या सुमुहूर्तावर सुरवात करतो!.........

......परंतु यापेक्षाही या दिवसाचे एक आणखी अक्षय्य महत्त्व आहे, कारण याच दिवशी महापराक्रमी वीर परशुराम याचा जन्म झाला. दशावतारातील हा सहावा अवतार होय. सप्त चिरंजीवापैकी परशुराम हे एक होत.

## विश्वामित्र आणि परशुराम

आपल्या पौराणिक कथांमध्ये ज्या काही महत्त्वाच्या व्यक्ति होऊन गेल्या त्यांपैकी विश्वामित्र व परशुराम हे द्वयद्विज उठून दिसतात. त्याचे कारण म्हणजे क्षत्रिय कुलात जन्म असूनही ब्रह्मर्षी पदवीसाठी विश्वामित्रांनी सर्वस्व ओतले व तेच आपल्या जीवनाचे अंतिम ध्येय त्यांनी ठरविले. म्हणजे बाह्यतः क्षत्रिय असले तरी त्यांचा मूळचा पिंडच मुळी ब्रह्मतेजयुक्त होता. या उलट परशुराम हे जरी क्षात्रकुलोत्पन्न नसले तरी त्यांचा मूळ पिंड हा क्षत्रियाचाच होता. आपण व्यवहारात बोलताना सहज म्हणतो की, अमूक व्यक्तिचा पिंडच मुळी वेगळा आहे. त्याला तो काय करणार? परंतु परशुरामाच्या जन्माचे वेळी अक्षरशः पिंडांची अदलाबदल झाली आणि त्यामुळे क्षत्रियकुलात जन्म न घेताही त्यांचा पिंड मात्र क्षत्रियच राहिला व त्यांचे क्षात्रतेजाने जग, देवता सर्वच दिपून गेले व सप्तचिरंजीवांत त्यांची गणना झाली. इतकेच नव्हे तर भगवंताच्या दहा अवतारातला एक अवतार असे परशुरामांना मानले जाते.

पितृवचनी रामचंद्रापूर्वीच पितृभक्ती व पित्राज्ञापालन करून परशुरामांनी आपले नाव अमर करून टाकले. पितृआज्ञेने त्यांनी साक्षात आपल्या रेणुका मातेचे मस्तक आपल्या परशूने उडवले. हे कृत्य पहाताच एवढे तामसी पिता जमदग्नि ऋषी

ते आपल्या या सुपुत्रावर प्रसन्न झाले व 'वर माग' असे ते म्हणाले. त्यावर परशुरामानी विलक्षण मागणे मागितले. ते म्हणाले, "माझ्या मातेला जिवंत करा आणि आपल्याच मुलाने आपले डोके उडवले होते, इ. प्रसंगाची स्मृतिही तिला राहू नये" या एकाच मागण्यावरून परशुरामांच्या पितृभक्तीबरोबर त्यांची सहृदयताही उठून दिसते. एरवी त्या प्रसंगाची स्मृती राहिली असती तर उर्वरित आयुष्य त्यांच्या मातेला अत्यंत दुःखात घालवावे लागले असते.

भृगुकुळातील जमदग्नीचा मुलगा परशुराम. परशुरामाने केलेल्या अद्वितीय पराक्रमामुळे त्याचे नाव विख्यात होऊन राहिले आहे. तो अत्यंत तेजस्वी असून धनुर्विद्येवर त्याची अलोट भक्ती होती. शंकराच्या कृपेमुळे त्याला कधीही कुंठित न होणारा परशू मिळाला होता. वर्तिकावत् देशाचा राजा चित्ररथ याकडे पाहून रेणुकेचे मन विथरल्याचा संशय जमदग्नीस आला, तेव्हा तिचा वध करण्यास त्याने आपल्या चार मुलांना सांगितले त्यापैकी परशुरामाने आपल्या मातेचा वध केला. त्यानंतर पित्याची कृपा संपादन करून रेणुकेस पूर्वीप्रमाणे जिवंतही केले. नर्मदेच्या उत्तर तीरावर कीर्तवीर्य उर्फ सहस्त्रार्जुन या नावाचा पराक्रमी पुरुष दिग्विजय करीत होता. त्याने ब्रह्मनिष्ठ वशिष्ठ ऋषींचा आश्रम जाळून टाकल्यावर त्यांनी 'तुझ्या सहस्त्र बाहूंचे वन परशुराम तोडून टाकील' असा शाप कार्तवीर्यास दिला, आणि ही शापवाणी लौकरच खरी ठरली. सहस्त्रार्जुनाने जमदग्नीच्या आश्रमातील कामधेनू पळवून नेली. इतकेच नव्हे तर पुढे त्याने परशुराम घरी नसता वृद्ध जमदग्नीचा एकवीस वेळा वार करून वध केला. परशुरामाच्या संतापाने सीमा ओलांडली.

त्याने प्रतिज्ञा केली. "क्षत्रियांचा समूळ नाश करीन;" आणि चितात सूड व करकमलात स्वपरशू घेऊन परशुधर घराबाहेर पडला. त्याने कार्तवीर्याच्या सैन्याची धुळधाण उडविली. परशुरामाने आपल्या कुऱ्हाडीने त्याचे सहस्त्रबाहु खडाखड तोडून टाकले, आणि त्याच्या सुताचाही पराभव करून तदनंतर परशुधराने एकवीस वेळा क्षत्रियांचा पराभव करून त्याने आपली प्रतिज्ञापूर्ति केली. ब्रह्मविद् ब्राह्मणांना कधी आपत्काळ प्राप्त झाला तरच मी शस्त्र धारण करीन, असा त्याचा निश्चय होता. सर्व पृथ्वी हस्तगत केली तर त्याला राज्य करावयाचे नव्हते. त्याने एक मोठा यज्ञ केला आणि सर्व संपत्ती ब्राह्मणांस दान देऊन परशुराम तापसा प्रमाणे महेन्द्र पर्वतावर आश्रम स्थापन करून राहिला.

परशुधरांचे क्षात्रतेज जर कुठे उठून दिसले असेल तर ते म्हणजे त्याने आपल्या पित्याचा अवमान क्षत्रियाकडून झाला म्हणून एकवीस वेळा निःक्षत्रिय पृथ्वी करून दाखविली या ठिकाणी शंकायोग्य म्हणजे, एकवेळ निःक्षत्रिय पृथ्वी केल्यानंतर

पुन्हा निःक्षत्रिय पृथ्वी करण्यांची जरुरी का भासली ? त्याचे उत्तर असे आहे की निःक्षत्रिय पृथ्वी केली याचा अर्थ क्षत्रियांचा बायका, मुले, म्हतारे-कोतारे यांसह नाश केला नाही. फक्त लढण्याला योग्य असे जेवढे क्षत्रिय अवनीवर होते त्या सर्वांचा नाश केला. असे वर्णन आहे की, दशरथराजा परशुरामाच्या भयाने आपल्या राणीवेशात स्त्रीरुप धारण करून दडून राहिला होता व म्हणूनच तो वाचला. यावरून परशुरामाची किती भीति त्या काळात होती हे दृग्गोचर होते. सहस्त्रार्जुनासारख्या अत्यंत श्रेष्ठ राजालाही त्याने अवतार समाप्ती करण्याचा प्रसंग आणला होता परंतु केवळ श्रीदत्तात्रेयाच्या सद्भक्त म्हणून त्याला पुन्हा त्यांनी जिवंत केले परशुरामाची शस्त्र व अस्त्रविद्येतील ख्याती ऐकून अनेक विद्यार्थी त्याचेकडे विद्यार्जनासाठी येत कर्णाच्या गोष्टीवरुन हे तर सुपरिचित आहेच.

परंतु परशुराधराच्या सामर्थ्याची कल्पना येण्याजोगा प्रसंग म्हणजे शूर्पारक क्षेत्र-अर्थात कोकण प्रांताची निर्मिती हा होय. आपल्या पराक्रमाने मिळालेल्या पृथ्वीचे त्यांनी ब्राह्मणांना दान केले. पुढे जेव्हा पितृतिथीचा प्रसंग आला त्या वेळी ब्राम्हणांनी स्पष्ट नकार दिला. ते म्हणाले,'' तुम्ही दान काय देणार ! सर्व पृथ्वी तर तुम्ही दान दिलीच आहे; अर्थात पृथ्वीच काय पण त्यातील धान्य व संपत्तीही तुमच्या हातात राहिलेली नाही. तुम्हाला या जागेवर उभेही राहता येणार नाही.'' त्यावर परशुरामांनी पाहीले तर तेथे स्मशानात चौदा गोत्राच्या चौसष्ट कुलांतील पुरुषांची प्रेते दहन होत होती. त्यांच्या चितेपासून त्या मृत व्यक्तिदेहांना परशुधरांनी आपल्या तप:सामर्थ्याने जिवित करून त्यांच्या कडून पितृतिथी यथासांग केली. त्याबद्दल दक्षिणा म्हणून संपूर्ण रत्नाकर, समुद्र मागे हटवून बारा कोस रुंदीचे विस्तीर्ण शुर्पारक क्षेत्र त्या ब्राम्हणांना दान केले. अत्यंत सुपिक अशा जमिनीत विपुल धनधान्य मिळून ते लोक सुखाने कालक्रमणा करू लागले. हेच चित्पावन ( चिते पासून पवित्र, शुद्ध झालेले ) कोकणस्थांचे मूळ पुरुष होत. याप्रमाणे एक संपूर्ण भूभाग समुद्रापासून मागून घेऊन परशुरामांनी कोकणस्थांची कुळं उत्पन्न केली. आपल्या कुलाच्या या आद्यदैवताची स्मृति प्रतिवर्षी कोकणस्थांमध्ये महालक्ष्मी पूजनात जागृत केली जाते. अन्यत्र कोठेही या पूजनात देवीच्या मुखवट्याची पूजा सांगितलेली नाही. परंतु कोकणस्थांमध्ये उकडीच्या मुखवट्याची पूजा या दिवशी करतात. आद्यदैवत परशुधराने पित्राज्ञेने आपल्या मातेचे जे शिरकमल उडवले त्या प्रसंगाची ती स्मृति आहे. रेणुकामाता हीच आदिशक्ति जगदंबा, आदिमाया होय. हीच विष्णूशक्ति महालक्ष्मी मानून तिच्या मुखवट्याची पूजा ( आश्विन शु. ८ ) या दिवशी करतात व मध्यरात्रीनंतर ते विसर्जित करतात. कोकणात

तांदुळाचीच विपुलता, चारित्र्याला धुतल्या तांदुळाचीच उपमा देतात व उकड ही शुद्धसत्वदर्शक सफेद असल्याने हा मुखवटा खुलून दिसतो.

## आदर्शवत् चरित्राचा महापुरुष

भगवान प्रभू रामचंद्र ज्यावेळी शिवधनुष्याचा भंग करून विवाह करून वैदेहीसह अयोध्येस परत यावयास निघाले त्यावेळी परशुराम मध्येच अवतीर्ण होऊन त्यांनी रामचंद्राची परिक्षा करण्याचे ठरवले. शिवधनुष्याचा जर भंग केलास तर माझ्याही धनुष्याला बाण चढव असे त्यांनी रामाला आव्हान दिले. श्रीरामानी अवतारी परशुरामास वंदन करून लीलया त्या धनुष्यास बाण चढवला. परशुधरांचे अवतार कार्य संपलेले असल्याने त्यातील तेज सहज श्रीरामाला प्राप्त झाले. त्याच बाणाने परशुरामांचा स्वर्गमार्ग श्रीरामांनी अडवला कारण सप्त चिरंजीवापैकी ते एक असल्याने त्यांना त्या मार्गाला जाण्याचे कारणच नव्हते. श्रीरामांना आशिर्वाद देऊन परशुराम या नुतन अवतारास प्रणिपात करून स्वस्थानाला प्रविष्ट झाले.

अशा प्रकारे कर्तुमकर्तुम अन्यथाकर्तुम अशा प्रकारचे सामर्थ्याने जगाला प्रभावित करणाऱ्या भगवान परशुरामाचे चरित्र आदर्शवत असेच आहे. दशावतारापैकी चिरंजीव असा हा एकच अवतार होय व म्हणूनच त्यांचा जन्म अक्षय्य तृतीयेला झाला असावा. आजही त्यांचे आपण अक्षय्य स्मरण विनयाने करूया !


## श्रीसाईभक्तांनो स्वानुभव त्वरीत पाठवा

भगवान श्रीसाईबाबा हयात असताना आणि त्यांच्या महानिर्वाणानंतर असंख्य साईभक्तांना बाबांविषयी विविध प्रकारचे अनुभव व दृष्टांत हरघडी आले आहेत, येत आहेत. बाबा आजही आपल्या भक्तांना प्रचिती दाखवीत आहेत. आपण जर आपणास आलेले असे बाबांसंबंधीचे सत्य आणि निवडक असे अनुभव अगदी मोजक्या शब्दात २५ मे पर्यंत त्वरीत लिहून पाठवावेत. मजकूर कागदाच्या एकाच बाजूने लिहिलेला व सुवाच्च असा असावा. आपले अनुभव पुस्तकरूपाने प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथात समाविष्ट करू. हा ग्रंथ येत्या विजयादशमीच्या सुमुहूर्तावर प्रकाशित करण्याचे आम्ही ठरविले आहे. आपल्या स्वानुभव मजकुरासोबत आपला संपूर्ण पत्ता व पासपोर्ट साईजचे एक छायाचित्र पण अगत्याने पाठवावे. पत्ता–संपादक श्रीसाईलीला "स्वानुभव" साईनिकेतन, प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

# वाऱ्यावरचे विचार

## ७. बुद्धिबळ

द. शं टिपणीस, ठाणे



बुद्धिबळ हा एक अलिकडे फार आवडता झालेला खेळ आहे. या खेळाच्या स्पर्धा होतात, जागतिक स्पर्धाही होतात. हा बैठा खेळ आहे. कारण तो बसून खेळतात. आता कोणी कोणी उत्साहाच्या भरात उभे राहून आपले प्यादे हळूच पुढे सरकवतात हा अपवाद. एकंदरीत खेळ बैठाच. शरीराला नव्हे तर यात बुद्धीला व्यायाम होतो. हा चालण्याचा व्यायाम आहे. कारण यात बुद्धि चालवली जाते. आजच्या युगात या व्यायामाची तरूणांना तसेच म्हाताऱ्यांनाही फार जरुरी आहे. आजचे युग असे आहे की, त्यात शारीरिक बलापेक्षा बुद्धिबलाचा उपयोग अधिक आवश्यक आहे. एक वेळ शारीरिक बल नसेल तर चालेल पण बुद्धिबलाशिवाय हल्लीच्या गुंतागुंतीच्या व्यवहारात माणूस कोठे, केव्हा व कसा फशी पडेल याचा नेम नाही. पेशव्यांच्या नानापुढे गडकऱ्यांचा देह आज फिका आहे. राष्ट्राला सैन्याइतकीच कदाचित जास्तच जरुरी बुद्धिबलाची आहे. म्हणून म्हणतो की, बुद्धिबळाचा खेळ जितका लोकप्रिय होईल व घरोघर खेळला जाईल तितका पाहिजे आहे. या खेळात प्यादी असतात. शत्रूला मारण्यासाठी सैनिक जसे डोळ्यात तेल घालून व हातात शस्त्र घेऊन खंदकात टपून बसतात तसेच विरूद्ध गड्याचे म्हणजे भिडूचे प्यादं मारण्यासाठी डोळ्यात तेल व तोंडात सिगारेट घालून टपून बसावे लागते. या खेळात घोडा, उंट, हत्ती आदी प्राणी असतात. त्यांना प्यादी म्हणतात. माणसाची जशी उभी आडवी तिरकस नाना प्रकारची चाल्याजी असते अगदी तशीच ही प्यादी मंडळी उभी आडवी तिरपी नाना चालीने चालतात. दुसऱ्याच्या प्याद्याला शह देणे म्हणजे मारणे. दुसरी गोष्ट ही की ही सर्व प्यादी लाकडाची असतात. परंतु जिवंत प्राण्याप्रमाणे ती चालतात, मरतात. अशा कल्पनेवर सगळा खेळ चालतो. खेळ संपला की ही सर्व मंडळी एका पेटीत गुण्यागोविंदाने नांदतात. पटावर आली की संघर्ष अंतरंगात सर्व मानव एकच पण संसाराच्या पटावर आले की नाना कल्पनांच्या पसाऱ्यात सापडून संघर्ष होतो. मुळात सर्व लाकडाचीच. नामरूपामुळे भेदाभेद. ही सर्व सृष्टी अशीच आहे. विचार, भावना, आशा आकांक्षांच्या कल्पनेच्या पसाऱ्यामुळे भेदाभेद, संघर्ष. बुद्धिबळात

अध्यात्म आहे व अध्यात्मात बुद्धिबळ आहे. बुद्धिबळातील खेळाप्रमाणे व्यवहारात जो तो आपलं प्यादं पुढे पुढे सरकवण्याचा प्रयत्न करतो. हा खेळनाद उत्पन्न करतो. त्यात संयम राखला नाही तर खेळाडू कर्तव्यालाच चुकतात. संसारातही नाना नाद उत्पन्न होतात. त्यात संयम पाहिजे, नाहीतर कर्तव्ये हुकून अंती तोटा होईल.

## ८. –फुले का कोमजतात ?

फार पुरातन घटना. एका गावाबाहेर लागून जवळच एक सुंदर बाग होती. अफाट नि विस्तीर्ण. हजारो जातीची टवटवीत हिरवीगार फुलझाडे शीतल झुळकीवर डोलत असत. जणू काही एका तालावर एक साथ डोलणारी गोजिरवाणी बालके, झाडावर नाना रंगाची, नाना छटांची, नाना रचनेची, तऱ्हेतऱ्हेची लहान मोठी, रंगीबेरंगी सुंदर कोमल फुले फुललेली असत. चिमुकली फुले, मोठी फुले, सुवासिक नाजूक फुले, दृष्टी खिळवणारी फुले, जिकडे तिकडे दाटीने पसरली होती. लांबून पाहिले की बाग म्हणजे रंगीबेरंगी सुंदर गालीचा वाटे. बाग म्हणजे गावचे नंदनवनच होतं. लोक फिरायला येत. घटकाभर बसत. ते देवाचे सौंदर्य दृष्टीत भरभरून घेत व दुःखी कष्टी मनाला आनंदीत करून जात. तो स्वर्गीय सुहास हुंगीत हुंगीत आनंदात डोलत. ह्या स्वर्गीय सौंदर्याला कुणी स्पर्श करीत बसत की सुखासाठी म्हणून एकादं फूल खुडून नाकाजवळ नेत नसत. जे नैसर्गीकरित्या येईल त्यात आनंद. बागेत पाट्या होत्या, सौंदर्य लुटा. खुशाल उपभोग घ्या पण दुरून. स्पर्श करू नका की तोडू नका. नियम भंग झाल्यास प्रायश्चित्त. अनेक वर्षे सुरळीत चालले होते. पुढे वर्षामागे वर्षे लोटली. काळ फिरला. विचार बदलले. मने पालटली. एक तरुण फिरत फिरत बागेत आला. ते स्वर्गीय सौंदर्य व मनोहर सुवास याने बेभान झाला. पाटी पाहिली. अं, किती अरसिक हे लोक ! सौंदर्य उतू चाललंय व हे उघड्या डोळ्यांनी बघताहेत आणि नाकाने सूं सूं करताहेत. वेडे कुठले. देवाने दुनिया फुलवली ती मानवाच्या उपभोगासाठी. असं सौंदर्य लांबून बघायचे ? छे. त्यात काय जीवनाचा आनंद आहे ? खरा आनंद सौंदर्याला स्पर्श करण्यात, नाकाजवळून सुवास घेण्यात. त्याने एक रंगीबेरंगी नाजुक सुवासिक फूल तोडले. हुंगत राहिला. काही वेळाने ते कोमजले. दुसरे तोडले. मग तिसरे. मग चौथे. प्रसन्न झाला. आनंदाने निघून गेला. दुसऱ्या दिवसापासून बागेतील फुले कोमजू लागली. कळ्या करपू लागल्या. झाडे खुरटू लागली. बाग उजाड झाली. लोकांनी खूप प्रयत्न केला. पण फुले फुलेनात. कळी खुलता खुलेना. एक दिवस एक योगी आला. बागेत गेला. पण सर्व काही माळरान. लोकांनी विचारले असे कसे हो झालं. योगी म्हणाला, "कोणाची तरी दृष्ट लागली. देवाच्या सौंदर्य दुनियेचा जरूर उपयोग घ्यावा, पण दुरून. आपल्या अमंगल जीवनाचा स्पर्श होऊ देऊ नये." किती खरे होते त्याचे बोल. इतिहास साक्षीला आहे. अल्लाउद्दीनची पापी नजर पडली व पद्मिनीच्या सौंदर्याचा होम झाला. आजही अनेक

सुमने व कलिका लालसी दृष्टीच्या पापी स्पर्शाने कोमजताहेत. कळ्या न फुलता करपून जात आहेत. देवाची दुनिया लुटण्याचा खरा मार्ग त्येन त्येक्तेन भुञ्जीथाः हा आहे. यातच जीवनाचा आनंद व सुख आहे. देवाच्या दुनियेला मानवी वासनेची आज दृष्टी लागली आहे.

## ९–कडू क्विनाईन

कडू ! छी ! कडू औषध, कडू भाजी, कडू फळ कोण खाणार हो. क्विनाईन अगदी कडू जहर. पण मलेरीयावरील रामबाण समजतात. भारताला अनेक रोग जडले आहेत. काही नवे, काही जुने. मलेरीया हा फार जुना, माणसे व डास एकत्र नांदू लागले तेव्हापासूनचा तो माणसाचा सोबती आहे. ६०–७० वर्षांपूर्वी मलेरीया-वर क्विनाईन हे एकच औषध होते. मायबाप इंग्रज सरकारने लोककल्याणासाठी पोष्ट ऑफीसमधून क्विनाईन मोफत मिळण्याची सोय केली होती. नंतर नावापुरती किंमत घेतली जाई. (हळूच भाववाढ करण्याची सरकारी पद्धत फार जुनी आहे.) ही पावडर खाताना ब्रह्मांड आठवे. पुष्कळ घ्यावे लागे, तरी मलेरीया जाण्याची खात्री नसे. थंडाई म्हणून भरपूर दूध प्यावे लागे. त्या स्वस्ताईच्या काळात गरिबांना दूध मिळणे मुष्कील होते. दुधाअभावी बहिरेपणा आदी उष्णतेचे विकार होत असं म्हणतात. पुढे पावडरच्या गोळ्या झाल्या, गोळ्यांवर साखर चढली. नंतर कॅप्सुल्स आल्या. कॅप्सुल्स काय किंवा गोळी काय एका दमात गिळावी लागे. पुढे टोचण्याच्या कलेचा शोध लागला. यामुळे पेशंटला टोचत बसणे हा एक अलिकडे धंदाच झाला आहे. आता कोणीही क्विनाईन टोचून घ्यावे. दुखेल पण कडू लागणार नाही. अशी ही कडू क्विनाईनची कहाणी. कडू औषध नावडते असले तरी कडूच गुणकारी असते व प्रकृती सुधारते.

पुष्कळांना हात देणारी होमिओपाथी कडू औषधातून उदय पावली आहे. सिंकोना उर्फ क्विनाईन या कडू वनस्पतीतून गोड होमियोपाथी जन्मास आली. आयुष्यात अर्धी कडू फळे चाखावी व मग मधुर फळे खावी. हालअपेष्टा, कष्ट, श्रम कोणाला गोड वाटतात ? कष्टमय परिस्थिती म्हणजे जीवनातील क्विनाईन आहे. जीवन सुधारण्यासाठी ती पत्करली पाहिजे, गिळली पाहिजे व पचनी पाडली पाहिजे. परिस्थिती गिळण्याने परिस्थिती सुधारते. वर येण्याचा हा मार्ग. अध्यात्मातील ही तत्वे आजच्या जमान्यात कडूच वाटतात. पण कीर्तन भजन नाटक सिनेमादी साखरेत घोळून ती घशाखाली उतरवली जातात. गिळताना (आचरणात आणताना) कडू लागतात, पण गिळल्या की किती गोड वाटते. समाधान, आनंद देणारे आध्या-त्मिक क्विनाईन थोडे तरी रोज गिळीत राहावे, मग पहावे आपली प्रकृती किती साफ स्वच्छ राहील ती.

# ज्योतिषशास्त्राचा ओनामा

ले.—होरालंकार शं. वा. देवधर.

## शनि

१) जन्मकुंडलीमध्ये लग्नी शनि असेल तर मनुष्य एकलकोंडा असतो. तो समाजामध्ये मिसळत नाही. धीटपणाचा अभाव असतो. (लहानपणी) सर्दी व पडशाचे विकार वारंवार जाणवतात. जसेजसे वय वाढत जाते तसतसा अंगी धीटपणा येत जातो व न्यूनगंड कमी होतो. पण ह्यांची चिकाटी व कष्टाळूवृत्ती वाखाणण्यासारखी असते. दीर्घोद्योग व दृढनिश्चय अंगी असूनही पुष्कळदा अपयशच पदरी येते. ह शनि मकर, कुंभ अगर तुळ राशीचा असेल तर हे लोक शिक्षणात पुढे येतात व मोठ्या अधिकाऱ्याच्या जागेवर चढतात. वायु राशीत शनि बलवान असतो. मेष, वृश्चिक राशीला वाईट असतो.

२) जन्मकुंडलीमध्ये द्वितीय स्थानी शनि असेल तर हे धनस्थान असल्यामुळे आर्थिक दृष्ट्या अनिष्ट आहे. अशा मनुष्याला नशीब प्रतिकूल लाभते. त्याची आर्थिक स्थिती ओढगस्तीची असते. इतर शुभयोग नसतील तर आयुष्यभर दारिद्र्याला तोंड द्यावे लागते. ही माणसे काटकसरी व हिशेबी असतात व दीर्घ प्रयत्नाने आपली स्थिती सुधारतात. यांचे बोलणे मुद्देसूद पण कमी असते. शनि वक्री असेल तर वाणीत दोष असतो. मसालेदार पदार्थांची आवड असते. हा शनि बलिष्ठ असेल तर यंत्रे, खाणी, इमारती, शेती, लोखंड ह्यांशी संबंध असलेल्या धंद्यात हे लोक उन्नती साधतात. जर हा शनि शुभ योगात असेल तर प्रचंड उद्योगधंद्यामध्ये काम मिळेल व उत्तर वयात आर्थिक स्थिती सुधारलेली दिसेल.

३) जन्मकुंडलीमध्ये शनि तृतीयस्थानी असेल तर प्रवास फारसे होत नाहीत. भाऊबंद व इतर नातेवाईक यांच्याशी पटणार नाही. दूर राहून चांगले संबंध रहातील. शेजाऱ्यांशी व नातेवाईकांशी खटके उडतील. अंगी सहनशीलता, चिकाटी व दीर्घोद्योग असल्यामुळे आखलेल्या योजनामध्ये शेवटी यश प्राप्त होते. ज्योतिष, हस्तसामुद्रीक वगैरे गूढशास्त्रांची आवड असते. कोणतेही काम विचारपूर्वक करण्याची सवय असते. त्यामुळे पश्चात्तापाची वेळ येत नाही. छोटे छोटे प्रवास होतात. पण प्रवासामध्ये पुष्कळदा नुकसान होते. गुरु बुधाची शुभ दृष्टी असेल तर लेखन कार्यात यश प्राप्त होते. त्यांचा भाग्योदय अकल्पितपणे होतो. न्यायीपणा व धूर्तपणा हे गुण अंगी असतात. उद्योगशीलता त्याच्या अंगी दिसून येते – त्याचा आहार थोडा असतो.

४) जन्मकुंडलीमध्ये शनि चतुर्थ स्थानी असेल तर हे मातृस्थान असल्यामुळे

मातेला त्रासदायक होते. एकटाच शनि असेल तर दीर्घकाळ मातृसौख्य मिळते. हा शनि मनुष्याला अनुकूल परिस्थिती लाभू देत नाही. तो आईवडीलांपासून दूर राहतो. स्थावर इस्टेटीला हा शनि चांगला. शनिवर अशुभ ग्रहाची दृष्टी असेल तर ग्रहसौख्य मिळणे दुर्लभ आहे. रवि-चंद्र-गुरु यांची शुभ दृष्टी असेल तर स्थावर इस्टेट, शेती, घर, जमिन यांची प्राप्ती होईल. मातृसौख्याला चांगला असला तरी पितृसौख्याला शनि मारक असतो. हा शनि असणारे लोक ऐपत असूनही फाजील काटकसरी असतात. पैसा असूनही त्याचा उपभोग घेत नाहीत पण अंतकाळी धर्मादाय म्हणून त्या पैशाचा विनियोग सढळ हाताने करतात. तरी अंतकाळी त्यांना समाधान लाभत नाही.

५) जन्मकुंडलीमध्ये पंचमस्थानी शनि असेल तर त्या मनुष्याला दीर्घ आयुष्य लाभते हे बुद्धिमत्ता, संतती व उपासनेचे स्थान आहे. गणित, शेतकी, इंजिनियरिंग अर्थशास्त्र वगैरे अभ्यासाला हा शनि चांगला असतो. तो बिघडला नसेल तर संतती चांगली देतो. पण विद्येमध्ये अडथळे निर्माण होतात. कितीही मेहनत करून फर्स्ट क्लास मिळविणे शक्य होत नाही. सट्टे शर्यती वगैरे बाबतीत हा शनि लाभदायक नसतो. स्त्रियांना पंचमस्थानचाशनि आर्त व दोष निर्माण करतो. संतती अगदी कमी होते. व प्रत्येक मुलांत जास्त अंतर असते. मुलांमध्ये काही तरी व्यंग असण्याचा संभव असतो. संतती पण विलंबाने होते. शुभसंबंधित असलेला शनि मात्र चांगली फळे पण विलंबाने देतो. वक्री शनि असलेला वाईट.

६ ) जन्मकुंडलीमध्ये षष्ठमस्थानी शनि असेल तर आरोग्याच्या दृष्टीने अपायकारक असतो. शीत विकार अपचन रक्तदाब, ह्या विकारांनी त्रास होतो खाण्यापिण्याच्या आवडीनिवडी फार असतात. हा शनि अशुभ ग्रहाच्या दृष्टीत असेल तर घरात चोऱ्या होतात. पण हे स्थान द्वितीय व दशम स्थान ह्यांशी त्रिकोणयोगात असल्यामुळे त्याला पैसा बरा मिळतो. चांगल्या कल्पना सुचतात. परंतु षष्ठस्थान हे शत्रूंवर मात करतो. हाताखालच्या नोकरांवर तो ताबा चालवितो व आपले वर्चस्व स्थापन करून त्यांच्या कडून करून घेतो. हा मनुष्याचा लाभ होतो.

७) जन्मकुंडलीमध्ये सप्तमस्थानी शनि असेल तर विवाह विलंबाने होतो. विवाहाच्या जोडीदारात खूप अंतर असते. शनि बिघडला असेल तर व्यसनी किंवा वाईट संगती घडतात. भागीदारीच्या धंद्यात अपयश येते. शनि, राहू, शनि – केतु, शनि–बुध या युत्या बहुधा आजन्म अविवाहित असण्याचे लक्षण आहे. अशा लोकांना विवाह करावासा वाटत नाही. शनि–हर्षल योगामुळे घटस्फोट करावा लागतो. विवाहाचा जोडीदार रूपाने सुंदर असणार नाही. पण कर्तव्यदक्ष, काटकसरी व सेवावृत्तीचा

असेल. शनि-राहू हा योग मात्र दांपत्यसुखाला चांगला असतो. शनि-केतूची युती मात्र विवाहसौख्याला घातक आहे.

८) जन्मकुंडलीमध्ये अष्टमस्थानी शनि असेल तर मनुष्याला दीर्घायुष्य लाभते. पण ते आयुष्य निरामय असत नाही, त्या मनुष्याला दीर्घकाळ टिकणारा एखादा रोग त्रास देत असतो तरीही त्याचे आयुष्य ६५ च्या पुढे आहे असे समजण्यास हरकत नाही. जरी आरंभीचे आयुष्य आर्थिक दृष्टीने वाईट गेले तरी शेवटी सुस्थिती येते व ज्या राशीत शनि असेल त्या राशीने दर्शविलेल्या आजाराने मृत्यू येतो. नोकरी मध्ये कनिष्ठ दर्जापासून चढत चढत तो वरिष्ठ दर्जापर्यंत पोचू शकतो. लाच-लुचपत सहज करू शकतो व तशी त्याला संधीही येते. अशा लोकांची पत्नी मात्र अतिशय सद्गुणी असते.

९) जन्मकुंडलीमध्ये नवमस्थानी शनि असेल तर अशा मनुष्याचा भाग्योदय २७ ते ३६ अशा वर्षांमध्ये निश्चितपणे होतो. ते फार महत्वाकांक्षी असतात व स्वतःच्या कर्तबगारीवर पुढे येतात. ते चांगले वक्ते व स्पष्ट बोलणारे असतात. चांगल्या वाईट सर्व मार्गांनी पैसे मिळवितात जर शनि शुभ योगात असेल तर ग्रंथ प्रकाशन, अध्यापन, शास्त्रांचा अभ्यास व कायदा यांचे अध्ययन घडते. अनेक प्रकारची धार्मिक कृत्ये त्याच्याकडून घडतात. सरकारी नोकरीमध्ये असलेले अधिकारी मतलबी व स्वार्थी असलेले आढळून येतात. शनि बिघडला असेल तर व्यसनी बनतात. शनि- राहू युतीमुळे धार्मिक बाबतीत चांगल्या गोष्टी घडतात. तीर्थयात्रा, दानधर्म, धर्मग्रंथाचे अध्ययन या गोष्टी सहज घडतात.

१०) जन्मकुंडलीमध्ये दशमस्थानी शनि असेल तर मनुष्याचे ज्ञान कमी असूनही त्याचा भाग्योदय होतो व त्याला मोठे अधिकार प्राप्त होतात. पण त्याच्या ह्या अधिकाराला धक्का बसल्याशिवाय राहात नाही. त्याचे मोठेपण दीर्घकाळ टिकत नाही. शनि शुभसंबंधित असेल तर मनुष्य धनवान, विद्वान, दीर्घोद्योगी व मोठा नेता होतो. स्वपराक्रमाने उदयाला येतो. पण सुखाच्या नंतर दुःख प्राप्त होते. शनि अशुभ असेल तर धंद्यात अडथळे येतात, मोटेपणा लाभत नाही. पुढे येण्यासाठी फार कष्ट पडतात. नोकरीमधून कमी होण्याची भिती असते. मिथुन तुळ व कुंभ राशीचा शनि मात्र चांगला. तो दशम स्थानाची सगळी शुभ फळे देतो.

११) जन्मकुंडलीमध्ये एकादशस्थानी शनि असेल तर त्या मनुष्याच्या महत्त्वाकांक्षा व इच्छा पूर्ण होतात. मित्र मात्र फार कमी असतात. त्याला पैसा भरपूर मिळतो. पण व्यवहारामध्ये नीट वागता येत नसल्यामुळे पैसे फार खर्च होतात. शनि अशुभ संबंधित असल्यास व्यसनी बनण्याचा व व्यसनी मित्र मिळण्याचा संभव असतो. एकादशस्थ शनि संततीसौख्यास मारक असतो. संतती कमी होते. जास्तीत जास्त दोन ते तीन मुले होतात. हे लोक फार धूर्त असतात. त्यांचे भाग्योदयाचे कामी शनिच्या धर्माप्रमाणे विलंब लागतो. उत्तरवयात ते यशस्वी होतात. एकंदरीत अकरावा शनि उशीरा का होईना पण यश प्राप्त करून देतो. हा शनी २४ व्या वर्षी चांगला धनलाभ घडवतो.

१२) जन्मकुंडलीमध्ये द्वादशस्थानी शनि असेल तर हे व्यय स्थान असल्यामुळे मनुष्य कर्जबाजारी असतो आणि तो बुद्धिमान, खटपटी, मेहनती असूनही संसारात अपेक्षेप्रमाणे सुख मिळत नाही. नातेवाईकांकडून त्याला कधीच मदत होत नाही. एकांतवास, धार्मिक वृती व पवित्र स्थळे त्यांची आवड असते. दुःखितांविषयी सहानुभूती मनात असते. हे लोक मोजकेच बोलणारे असतात. शनि बिघडला असेल तर राजकीय संकटे, कैद, शत्रुत्व वगैरे आपत्ती निर्माण करतो. प्रिय नातेवाईकांचे मृत्यु घडल्यामुळे आयुष्यात नैराश्य निर्माण होते. अपघाताचेही भय असते. एकंदरीत बारावा शनि हा वाईटच.

* *

# श्रीसाईनाथ

## [ श्रीसद्गुरु साई महाराज ललित चरित्र ]

श्री. र. श्री. पुजारी, पुणे.

### ४५. शामि ! अरे मी देव नव्हे, दास ! बंदा ! यादगार !

माधवराव असे विचारात गढले आहेत. तर समोरच डॉ. पिळे आपल्या लांब केलेल्या पायावरून हळुवारपणे हात फिरवीत आहेत. जेमतेम घोट्यापर्यंत हात पोचताच कळ असह्य होऊन रडत आहेत. मनात म्हणत आहेत. आपणासमोर बसवून घेऊन बाबा मला रडवीत आहेत बरे? कोणत्या पापासाठी बाबा मला रडवीत आहेत ? ते पाप अजून पुरे भोगून झालें नाही का ?

पायावरून हात फिरविता फिरविता डॉक्टराना मालेगावच्या त्या डॉक्टरांची आठवण आली. त्यांच्या त्या हाड्यात्रण झालेल्या पुतण्याची आठवण आली. एका लहान वयाच्या लेकराच्या वेदना न पाहवून डोळयातून पाणी काढीत असलेले ते सबंध कुटुंबच डोळ्यापुढे उभे राहिले.

स्वतः नामांकित सर्जन. प्रख्यात डॉक्टर. पण त्या डॉक्टरांना आपल्या पुतण्याचा हाड्यारोग काही दाद देईना. त्यांची स्वतःची आणि त्यांच्या मोठमोठ्या सर्जन मित्रांची या हाड्यात्रणाने मती गुंग करून टाकली. मोठ्या आत्मविश्वासाने त्या सर्वांनी मिळून त्या लेकराच्या पायावर शस्त्रक्रिया केली. पण तिचाही उपयोग झाला नाही. आया-बायांचे देवदेवकीचे उपाय केले. पण तेही व्यर्थ ठरले. शेवटी भोळ्या भाविकांना शरण जाऊन त्यांच्या सूचनेवरून येथे आले.

येथे येताच बाबांचे दर्शन घेतले. चरणी लोटांगण घेतले. म्हणाले " महाराज, पूर्वजन्मीच्या काही पापाची शिक्षा म्हणून भोग भोगण्याचा प्रसंग आम्हावर आला असता तर त्याचे दुःख एवढे तीव्रपणे जाणवले नसते. पण ज्याला पापाचा स्पर्शही अद्याप माहीत नाही, अशा या लेकराचे हाल डोळ्यांनी बघवत नाहीत. मन माशासारखे तळमळते.

आपण शरणागतांचे आधार. केवळ आपल्या अमृतदृष्टीने किंवा उदीनेही अनेक असाध्य व्याधी आपण बऱ्या करता असे ऐकले. म्हणून येथवर आलो. महाराज, आम्हा दीनावर दया करावी. आमचा जीव की प्राण असा हा बाळ—याला या व्याधीतून मुक्त करावे. आपल्या पायांवर याला ठेवला आहे. त्याला तारणे किंवा मारणे आता केवळ आपल्याच हाती आहे."

करुणामूर्ती बाबांनी त्याला लगेच अभय दिले. म्हणाले, "माझ्या मशिदी-तील त्या फकिराच्या आसऱ्याला तुम्ही आला. आता सर्व चिंता सोडा. तुमचा बाळ

बरा झाला असे समजा. अहो, येथे येऊन तसाच दुःखी कष्टी मनाने कोणी गेला, असे कधीच झालेले नाही. होणार नाही.

आता ही उदी घ्या. त्या व्रणावर फासा. देवावर भरवसा ठेवून राहा. आठ दिवसात गुण येईल.''

बाबांनी त्या मुलास समोर बसवून घेतला. त्याने लांब केलेल्या त्या काडी-सारख्या पायावरून मोठ्या प्रेमाने हात फिरविला. कृपादृष्टीने त्या व्याधीकडे पाहिले. मग म्हणाले, ''आता तुम्ही खुशाल आपल्या बिऱ्हाडी जा. चिंता मुळीच करू नका.''

महापुरुषाचे प्रत्यक्ष दर्शन, स्पर्श, आश्वासन, आशिर्वाद ज्याला लाभला तो धन्य होय. अशा व्यक्तिपैकी मी असताना मला थोडीसुद्धा कळ का सहन होऊ नये बरे? मनास इतकी उतावीळ का यावी?

डॉ. पिळे याना माधवरावांचे कनिष्ठ बंधू बापाजी यांच्यावरील एका अरिष्टाचा प्रसंग आठवला.

बापाजी त्यावेळी साऊळ विहिरीवर राहात होते. एके दिवशी रात्री त्यांच्या पत्नीला सपाटून ताप भरला. ताप कशाचा काय म्हणून चौकशी करतात तर जांघेवर चांगल्या मोठ्या सुपारीएवढ्या प्लेगाच्या दोन गाठी!

रात्रीची वेळ. जवळपास आधारास किंवा धीर देण्यासुद्धा कोणी मनुष्य नाही. पत्नीची परिस्थिती तर क्षणाक्षणाला विकट होत चाललेली. हे पाहून बापाजींची पाचावर धारण बसली. काय करावे, कसे करावे काही सुचेना. अंधारात तशीच शिरडीच्या दिशेने धाव ठोकली. वडील बंधू माधवराव यांचे दार ठोठावले. पण तोंडातून शब्द फुटेना. क्षणभर काही बोलता सांगताही येईना.

अखेर सर्व वृत्त माधवरावांच्या कानी घातले. त्यांचा हात धरून, रडवेले होऊन त्यांना साऊळ विहिरीकडे ओढून नेऊ लागले. पण त्या मायामोहास बळी न पडता माधवराव आधी बाबांकडे आले. भावजयीची ही भयंकर हकिगत बाबांच्या कानी घातली. करुणा भाकली. तेव्हा बाबा म्हणाले, "अरे, कशाचा ताप आणि काय! आपला बाप तो अल्ला मालिक सर्व काही पाहायला एवढा समर्थ असताना तुझी ही धावाधाव कशासाठी- तू काय तिचे बरे करणार आहेस?

आता सांगतो तसे कर. ही उदी तिला दे पाठवून! म्हणावे, ही उदी तिला पाण्यात कालवून प्यायला दे. तिच्या अंगालाही थोडी चोळ, आणि अगदी निर्धोर राहा, आपोआप ती बरी होईल.

आणि हे बघ शामा! तू उद्या सकाळी सूर्योदयाच्या सुमाराला त्यांच्याकडे जाऊन ये. आता त्यांच जाण्याचे काही कारण नाही. जा तू घरी जाऊन स्वस्थ झोप.

सकाळच्या सुमाराला माधवराव साऊळ विहिरीवर जाऊन पहातात तर बापाजींची पत्नी नेहमी प्रमाणे प्रातःकालीन घरकामात दंग!

ते दृश्य पाहून माधवरावांचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. कसा बसणार ? जी काल तापाने फणफणली, जांघेस प्लेगाच्या गाठी उठल्या, ती स्त्री आज लवकर उठून खुशाल सडा-संमार्जन करून अंगणात सुंदर रांगोळ्या रेखीत आहे !

तरीच पहाटे दर्शन घेऊन निरोप घेण्यास निघालो तेव्हा मला बाबा म्हणाले, "शामा, परत यायला विलंब लागता कामा नये, बरे का! गेल्या पावलीच माघारा ये."

माधवरावानी या सर्व गोष्टींचे आश्चर्य बापाजीकडे प्रकट केले, तेव्हा काल नाराज झालेले बापाजी आज खूष होऊन म्हणाले, "ही कुणाची करामत म्हणून तू मला विचारतोस ! अरे, ही सर्व बाबांच्या कृपेची, त्यानी दिलेल्या मूठभर उदीचीच करामत आहे रे ! दुसरे काय ?"

पुढे चहा घेऊन माधवराव येथे मशिदीत येऊन बाबांना म्हणाले, "देवा, अरे ! नित्य काही तरी वावटळ उठवून काय ही आम्हा गरिबांच्या मनाची त्रेधा-तिरपीट तू उडवितोस !" त्यावर बाबा म्हणाले, "शामा, वावटळे उठविणारा मी कोण ! वावटळे उठविणारा तो एक दयावंत अनंत अल्ला ! अरे, मी अनल हक नव्हे, यादे हक्क ! देव नव्हे, दास ! कर्ता - करविता तो ! मी त्याच्या हातातील बाहुली-प्रमाणे असलेला केवळ एक साक्षी ! बंदा ! यादगार !"

भक्तांवरील बाबांच्या कृपेची अशी शेकडो उदाहरणे डॉ. पिल्ले यांच्या डोळ्यासमोर दिसू लागली.

त्या भक्तांत सर्व जातीचे लोक होते. स्त्रिया होत्या, पुरुष होते, मुले होती. सर्व उपाय थकल्यानंतर अखेरचा उपाय म्हणून ही सर्व मंडळी बाबांकडे आली होती.

असाच मुंबईमधील कोणी एक इराणी इसम. त्याच्या तान्ह्या मुलीची वाचा तासात.साला बसे. तासातासाला आकडी येई. धनुकली होऊन बसल्या जागीच बेशुद्ध पडे. तो इसम पारल्यास काकासाहेब दीक्षितांना शोधत आला. काकासाहेबांनी त्याला उदी दिली. या उपायामुळे ती मुलगी हळूहळू बरी झाली.

हरद्यानजीकच्या एका गावी एका वृद्ध मनुष्यास असाच मूतखड्याचा त्रास होऊ लागला. त्यावेळी गावातील इनामदारानी त्याला उदी दिली. ती अंगात भिनताच मूतखडा मूत्राद्वारे आपोआप बाहेर पडला.

मुंबईमधील कायस्थ प्रभू जातीच्या एका स्त्रीचे बाळंतपण फार अवघड होते. जणू तो तिचा एक पुनर्जन्मच ! या गोष्टीमुळे तिला बाळंतपणाची धास्ती वाटे.

एका बाळंतपणाच्या वेळी तर मृत्यूच्या भयाने ती स्त्री शिरडीस येऊन राहिली. बाबांची पूजा, आरती, सहवास यात कालक्रमणा करू लागली. पुढे प्रसूतीची वेळ

येऊन ठेपली तेव्हा प्राणांतिक यातना होऊ लागल्या. ही गोष्ट त्या स्त्रीच्या एका शेजारणीने जाऊन बाबांच्या कानी घातली. बाबानी तिच्यासाठी उदी दिली. उदी पाण्यात कालवून अखंड सुरू असलेल्या साईनामासह तिने एक घोट घेतला, आणि काय आश्चर्य, पाच मिनिटात तिची सुटका झाली. चांदोरकरांच्या मुलीप्रमाणे.

उदीचा प्रभाव असा किती सांगावा ! किती वर्णावा !

उदीमुळे कोणाच्या पोटातील गाठ फुटून मळद्वारे रोगाचा पूर्ण निचरा झाला. कोणाचा विंचू उतरला. कोणाचा निद्रारोग नाहीसा झाला. कोणाचे तुटलेले ऐहिक जोडले जाऊन आरोग्य–धन–दारा–सुख–संपत्ती इत्यादी सर्व त्याना पुन्हा लाभले.

फार कशाला, ज्या ज्या वेळी उदी हाताशी आली नाही त्या त्या वेळी उदीचे कार्य उदबत्तीच्या राखेने केले ! रस्त्यावरील चिमुटभर मातीने केले ! जणू साईमंत्राने पुनीत झालेली बाबांच्या फोटोसमोरील उदबत्तीची ती राख उदीरूप झाली ! रस्त्यावरील मातीलाही चांदोरकरांसारख्या निस्सीम भक्ताच्या हस्तस्पर्शामुळे उदीचे दिव्यत्व लाभले !

डॉ. पिल्ले बाबांच्या लीलामृतात अशा रीतीने बुडून गेले असतानाच त्यानी एक जोराची किंकाळी फोडली. मस्तकापर्यंत जाऊन भिनलेली ती प्राणांतिक कळ यत्किंचितही न सोसवून त्यानी ठणाणा केला. त्यांचा जीव अति कळवळला.

पण हाच क्षण नेमका त्यांच्या दुःखमुक्तीचा होता.

त्या टीचभर मशिदीत पणत्या लावताना अबदुलभाईंचे त्यांच्या पायाकडे एक क्षणभर दुर्लक्ष झाले. डॉ. पिल्ले यांच्या सुजलेल्या लालबुंद पायावरच नेमका अबदुलभाईंचा पाय पडला !

या सर्व प्रकारामुळे डॉ. पिल्ले यांची मनःस्थिती विलक्षण भावनाप्रधान झाली. एकीकडे ते बाबांचे गाणे गाऊ लागले. दुसरीकडे मधून मधून येणारी कळ सहन न होऊन रडूही लागले. हे पाहून बाबा म्हणाले, “ पाहिलेत ? भाऊची स्वारी एवढ्यात गाऊही लागली ! ”

हे ऐकून डॉ. पिल्ले म्हणाले, “ बाबा, तो काऊ येऊन केव्हा टोची मारील ? ” तेव्हा बाबा म्हणाले, “ आता तू स्वस्थ वाड्यात जाऊन पड. तो काऊ काही पुन्हा येणार नाही. टोची मारणार नाही. अरे, मघाशी नाही का तो गेला येऊन ! अबदुलभाईंच्या रूपाने ! तुझ्या पायाच्या नारूला पुरता गाडण्यासाठीच येऊन गेला तो काऊ ! ”

### ८६. तू शिरडीच्या बाबांपाशी जा. तुला पूर्ण मनःशांती लाभेल.

नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंगी देवी म्हणजे मोठेच उग्र दैवत ! या दैवताजवळ एखाद्या भक्ताने जाऊन नुसते पोचणे हेही मोठे खडतर काम ! रडतोंडीच्या घाटा-

मधून सप्तशृंगीचे शिखर चढता चढता जो रडकुंडीस आला नाही असा भक्त विरळा! भक्ताची इतकी परीक्षा पाहिल्यानंतर मगच देवी त्याच्यावर प्रसन्न होणार! त्याला आपले दर्शन देणार!

पहाटेपासून सप्तशृंगीचा डोंगर चढत असलेला तो भक्त बारा वाजण्याच्या सुमारास हुश्य हुश्य करीत एकदाचा वर पोचला. तेथे असलेल्या एका घराच्या ओसरीत एका बाजूस विश्रांती घेत बसला. मग घरातून बाहेर आलेल्या एका मध्यमवयीन गृहस्थाकडे त्याने चौकशी केली, "या क्षेत्रात काकाजी वैद्य या नावाचे एक उपाध्ये आहेत असे नाशकास कळले. ते उपाध्ये कोठे राहातात? काही धार्मिक विधी वगैरे करण्यासाठी मी येथे आलो आहे. आम्ही कोपरगावकडचे देशपांडे."

त्या गृहस्थानी देवीच्या त्या भक्ताचे स्वागत केले. म्हणाले, "या, या असे. वर या. काकाजी वैद्य तो मीच. मीच येथील क्षेत्रोपाध्याय आहे. सर्व धार्मिक कृत्ये मीच करतो. देवीचा पुजारीही मीच आहे."

आपण योग्य त्या स्थळीच पोचलो याचा त्या भक्ताला आनंद झाला. मनाशी तो म्हणाला: एकूण देवीचा नवस फेडण्याचा योग आज आला तर! इतक्या वर्षांनी!

तो भक्त पायऱ्या चढून वर आला. हातपाय धुवून बैठकीवर बसला. काकाजींना तो भक्त सांगू लागला—

म्हणाला, "मी लहान होतो तेव्हाची गोष्ट आहे.

मी एकदा फार आजारी पडलो. तेव्हा आईने देवीला गाऱ्हाणे घातले. म्हणाली: आई, हे तान्हे बाळ आता तुझ्या ओटीत घातले आहे. त्याला तारणारी किंवा मारणारी तूच. जर बाळ बरे झाले, तर तुझ्या वणीला येईन. लेकरू तुझ्या पायांवर घालीन.

या गोष्टीला कित्येक वर्षे उलटून गेली. प्रापंचिक अडचणीमुळे येथे येऊन देवीचा नवस फेडणे आईला जमले नाही. पुढे काही वर्षे गेली आणि आईच्या दोन्ही स्तनांना खांडके झाली. त्यावेळीही आई पुन्हा नवस बोलली. म्हणाली: आई, देवी असा कोप करू नको. ही खांडके एवढी बरी कर. मी लोटांगणे घालीत दर्शनाला येईन. चांदीचे स्तन करून ते तुझ्यावरून ओवाळून तुला वाहीन.

हाही नवस फेडू फेडू म्हणता तसाच राहिला.

पुढे आईचा अंतकाळ जवळ आला. तेव्हा मला जवळ बोलावून ती म्हणाली: बच्या, मला एक वचन दे.

काय, कसले वचन वगैरे मी विचारता ती म्हणाली: देवीचे दोन नवस फेडायचे तसेच राहिले. मी आता चालले. आता तू तरी जाऊन ते दोन नवस फेडून ये.

पुढे, जाऊ जाऊ म्हणता आणखी काही वर्षे लोटली. तीसावर वर्षे होऊन गेली. एक दिवस गावात एक ज्योतिषी आला. अनेक थोरामोठयांचे भविष्य त्याने पाहिले. माझा धाकटा भाऊ बापाजी म्हणून आहे, त्यानेही ज्योतिषाला आपले भविष्य विचारले. तेव्हा ज्योतिषी म्हणाला : तुमच्यावर वारंवार गंडांतरे येतात, हा कुलदेवीचा कोप आहे.

मी भावाच्या घरी गेलो तेव्हा त्याने ही हकिगत मला सांगितली. म्हणाला : बघ ! तुला आईने जाताना सांगितले होते. ते आपण केले नाही. म्हणून ही अशी संकटे वारंवार आपणावर येतात.

त्याचे म्हणणे मला पटले. सोनाराला बोलावून मी चांदीचे दोन स्तन करविले. ते घेतले आणि मशिदीत बाबांकडे गेलो."

मशीद ! बाबा ! कोणते हे बाबा ? कोणत्या ? कोणत्या गावचे ? शिरडीचे तर नसतील !

काकाजींचे मन काही एका शंकेने व्याकूळ झाले. डोळे विस्फारुन ते या नवीन भक्तांकडे पाहू लागले. त्याला बोलताना मध्येच थांबवून म्हणाले, "मी आपणास बोलताना मध्येच थांबविले याचा राग मानू नये. पण एक विनंती करतो. आपल्या गावाचे नाव—नाव कोणते ?"

"शिरडी. कोपरगाव तालुक्यात हा गाव आहे. कोपरगावापासून नऊ मैलावर"

हिऱ्या-माणकानी भरलेला गुप्त खजिना आकस्मिकपणे हाती लागावा तसा आनंद काकाजींच्या चेहऱ्यावर दिसला. आनंदाने गहिवरून जवळ जवळ ते ओरडलेच, "आपण शिरडीचे ? शिरडीच्या बाबांचे भक्त ? खरोखर बाबांची कृपा माझ्यावर केवढी आहे ! जे कळावे म्हणून रात्रंदिवस मी तळमळत होतो ते आपल्या पायानी चालून माझ्या घरी आले ! भाग्य चालून आपल्या घरी यावे त्या प्रमाणे

काकाजींच्या दोन्ही डोळ्यातून अश्रूंचा पूर वाहू लागला.

ते अश्रू पुसून, दोन्ही हात जोडून, जणू स्वतः बाबाच समोर बसले आहेत अशा भावनेने काकाजी बोलू लागले. म्हणाले, "खरोखर ईश्वरी लीला अगाध आहे. अतर्क्य आहे.

काकाजी आपली हकिगत सांगू लागले.

म्हणाले, "दुर्दैवाचा फेरा कुणास चुकला आहे ? मीही त्याच्या चक्रात सापडलो. एकावर एक येणाऱ्या प्रापंचिक आपत्तीमुळे गांजलो घरदार नकोसे झाले. संन्यास घेऊन कोठेतरी निघून जावे असे वाटू लागले.

पण संन्यास घेतला म्हणून मनोव्याधींचे मनगुटावर बसलेले भूत असे सैल सोडणार थोडेच ! मरणाच्या दारापर्यंत ते बरोबर येणार ! मृत्युच्या शेवटच्या क्षणीही ते माणसाची गय करणार नाही. त्याला भोसकत राहाणार !

शरीराची व्याधी शंभर पटीने बरी. नेवढा अवयव कापून तरी टाकता येतो. पण या मनाला कापणार, छाटणार तरी कसे ? कोणत्या शस्त्राने ? हे शस्त्रकर्म करणार तरी कोण ?

रडणारे लेकरू आईकडे धाव घेते. मी आई देवीकडे धाव घेतली. रात्रंदिवस तिच्या पायाशी बसून, रडून म्हणालो, "आई, असे कोणते पाप हातून घडले म्हणून अशांतीचा हा शाप तू मला दिलास ? मला दुसरे काहीही नको. एक केवळ शांती दे. मनःशांती दे."

अनन्य धावा कधीच वाया जात नाही. एक दिवस आई देवी माझ्या स्वप्नात आली. म्हणाली, "तू बाबांपाशी जा. तुला पूर्ण मनःशांती लाभेल."

जागा होऊन मी विचार करू लागलो : बाबा ? कोण बाबा ? त्र्यंबकेश्वरीचे साक्षात श्रीशंकर तर नव्हेत ! हो, तेच असतील. विश्वातील सर्व अशांतीचे हलाहल प्राशन करून प्रसन्नचित्त झालेला तो विश्वनाथ मला या कारणाने बोलावीत असेल ! मजकडून या निमित्ताने काही शुभ कार्य त्याला कदाचित करवून घ्यायचे असेल !

त्र्यंबकेश्वरी मी दहा दिवस राहिलो. प्रातःस्नान करून त्र्यंबकेश्वरावर रुद्रावर्तने करून अभिषेक केला. संततधार धरली. तरी मनाची अशांती, उदासीनता, अस्थिरता यत्किंचितही पालटेना. दुश्चित होऊन बसलेल्या मनाला उल्हासाचा वाराही लागेना. जणू मनाचे सर्व चैतन्यच नष्ट झाले. मन जड झाले. खिन्नता, उदासीनता, म्लानता यानीच मनाचा कायमचा ताबा घेतला.

पुन्हा देवीला अनन्यभावे शरण गेलो. काकुळतेने म्हणालो, "आई, अजून किती अंत पहाशील ? आता एक हे टोक तरी दाखीव नाहीतर ते टोक तरी दाखीव. या मधल्या स्थितीत ठेवून माझे असे हाल करू नकोस. अशी निष्ठूर होऊ नकोस."

त्याच रात्री देवीचा पुन्हा दृष्टांत झाला.

देवी म्हणाली, "मी जे 'बाबा' म्हणाले, ते शिरडीचे साईबाबा. त्र्यंबकेश्वरास तू उगाच गेलास."

मी विचार करू लागलो : मी या डोंगरावर. जवळ जवळ एकांतवास पत्करून राहिलेलो मनुष्य. शिरडी कोठे आहे मला कसे कळणार ? कोण सांगणार ? तेथे मला नेणार तरी कोण ? कसा ? सारेच जवळ जवळ अशक्य.

पुन्हा मन तळमळू लागले. रात्रंदिवस बाबांचाच विचार करू लागलो. म्हणु लागलो, "बाबा, मी असा दुर्बळ. अंधारात चाचपडत असलेला. तुम्ही या आणि मला शिरडीस न्या. तुमच्या मनात असेल तर कोणाकरवीही तुम्ही मला शिरडीची वाट दाखवाल."

काकाजी वैद्यांचे डोळे प्रेमाश्रूंनी पुन्हा वाहू लागले. ते काही बोलणार तोच माधवराव म्हणाले, "काकाजी, बाबांनीच मला तुमच्याकडे पाठविले आहे असे

समजा. कारण नवस फेडण्यासाठी मी मशिदीत गेलो तेव्हा बाबा मला म्हणाले "तू देखील जाऊन ये जा लगेच."

भक्त आले. त्या सर्व मंडळींच्या हातात मोठमोठे हार, पेढ्यांचे पुडे, फळफळावळ वगैरे होते. अंधेरीचे भक्त पाटीलही त्यांच्या समवेत होते. पूजासाहित्य घेऊन बाबांच्या जवळच पाटील थांबले होते.

एवढ्यात खाली मोकळ्या पटांगणात जेथे रथ ठेवीत असत तेथे कुदळ मारून फरशीची सुरवात झाली. कुदळीचा तो आवाज कानी आला मात्र, बसल्या जागेवरून बाबा एकदम उठले. हिरण्यकश्यपूचा वध करणाऱ्या नरसिंहाचा अवतार धारण करून म्हणाले, "कोण मारतो तेथे कुदळ! त्याचे पेकाट मोडतो! डोके फोडतो!"

हातात आपला सटका घेऊन खालच्या त्या कामकरी मंडळींवर बाबा धावून गेले. त्या क्षणी कुदळ तेथेच टाकून ती मंडळी जीव घेऊन पळत सुटली. काकाही ते रूप पाहून भयभीत झाले. तेथून काढता पाय घेऊ लागले. तोच बाबांनी त्यांचा हात धरला. म्हणाले, "जातोस कोठे? बस खाली!"

एवढ्यात तेथे तात्याबा आले. लक्ष्मी आली. त्यांनाही शिव्यांची लाखोली मनसोक्त वाहून झाली. अंगणाबाहेर काही मंडळी भीतीने उभी होती. त्यानाही त्यातील काही प्रसाद मिळालाच!

इतक्यात बाबाना तेथे जमिनीवर पडलेली एक पिशवी दिसली. तिचे तोंड सोडून पाहिले तर तिच्यात भाजलेले दाणे दिसले. भीतीने पळून जाताना ज्या कोणाची पिशवी हातातून गळून पडली, ती तशीच तेथे राहिलेली असावी!

त्या पिशवीत एक पक्का शेर तरी दाणे असावेत. ते मूठ मूठ मारून, सालपटे दूर करून काकांच्या हातावर ठेवू लागले. म्हणू लागले, "खा! कसे उत्तम भाजले आहेत! जसे काजू!"

बाबा एकीकडे दाणे हातावर चोळून चांगले स्वच्छ करीत होते. काकांना देत होते. आपणही मधून मधून तोंडात टाकीत होते. तर दुसरीकडे शिव्या देणेही चालूच होते!

अशा रितीने ती अख्खी पिशवी संपवून बाबा म्हणाले, "जा! आता प्यायला पाणी घेऊन ये. मला तहान लागली आहे."

काकानी झारी भरून आणली. ते पाणी बाबा प्यायले. मग काकाना म्हणाले, "तूही पाणी पी."

काका पाणी पिताच बाबा म्हणाले, "जा! तुझे जुलाब बंद झाले!"

मग बाबा काकाना म्हणाले, "मघा कोठे पळाले ते बामण? मला भिऊन! जा, त्या सर्वांना इकडे बोलावून आणा."

काकानी त्या सर्व मंडळीना बोलावून आणले. मशीद पुन्हा पूर्वीप्रमाणे भरली. हे पाहून काका महाजनी स्वतःशी म्हणाले, "एकूण माझ्या व्याधीवर औषधोपचार करण्यासाठी बाबांनी सर्वांना मशिदीबाहेर हाकलले तर!"

माधवराव विचार करू लागले.

मनाशी म्हणाले, "नारू काय, थंडीताप काय, महामारी काय आणि जुलाब-पीडा काय—या झाल्या तशा सामान्य व्याधी. परंतु चौदा वर्षांचा जुना पोटशूळ बरा होणे किंवा कर्णरोगासारखा जीवघेणी रोग बरा होणे ही गोष्ट काय सामान्य आहे!

हरद्याचे दत्तोपंत चौदा वर्षे पोटशूळाने तळमळले. सर्व उपाय करून कंटाळले. शेवटी बाबांची किर्ती कर्णोपकर्णी ऐकून येथे आले. म्हणाले, बाबा, ही काय व्याधी जन्माची माझ्या मागे लागली! समजते तसे कधी कोणाचा घातपात केला नाही. मातापित्यांच्या सेवेत कुचराई केली नाही. पूर्वजन्मी काय घडले ते मात्र आठवत नाही. पण हे जे दुःख भोगत आहे ते पूर्वजन्मीच्या कोण्या मोठ्या पापामुळेच! बाबा, त्या अज्ञात पापामधून हात देऊन तुम्ही मला वर काढणार नाही काय? आरोग्य देऊन पुनर्जन्म देणार नाही काय?"

बाबांना दत्तोपंतांची दया आली. त्यांच्या मस्तकावर आशीर्वादाचा हात ठेवला. म्हणाले, "काही दिवस येथे राहा. पूर्ण बरा होशील!

दत्तोपंत बरे झाले. बाबांची आज्ञा घेऊन, उदी घेऊन हरद्यास मोठ्या आनंदाने परत गेले.

जे दत्तोपंतांच्या बाबतीत घडले अगदी तसेच आळंदीच्या या स्वामींच्य बाबतीत घडले.

स्वामींच्या कानात कसला गूढ रोग झाला. रात्रंदिवस कान उपाळू लागला. त्यामुळे एका क्षणाचीही निद्रा त्याना लाभेना. अखेर कानावर शस्त्रक्रिया केली. पण त्याचाही काही उपयोग झाला नाही.

शेवटी बाबांची किर्ती ऐकून येथे आले. त्याना घेऊन मी येथे मशिदीत आलो. स्वामींची कर्णव्यथा बाबांच्या कानी घालून बाबांना कृपेसाठी प्रार्थना केली. तेव्हा बाबा स्वामींना एवढेच म्हणाले, "अल्ला अच्छा करेगा."

बाबांच्या चरणी मस्तक ठेवून, आशीर्वाद घेऊन, उदीप्रसाद बरोबर घेऊन स्वामीनी बाबांचा निरोप घेतला. पुण्यास गेले. आठ दिवसानी मला पत्र आले. त्यात त्यानी लिहिले होते, "बाबानी मस्तकावर हात ठेवला त्याच क्षणी कानाचा ठणका अजिबात थांबला. सूज मात्र कायम होती. डॉक्टर म्हणाले की पुन्हा शस्त्रक्रिया करावी लागेल. म्हणून तसाच परत मुंबईस गेलो. तेथील डॉक्टरानी

बिलकुल सूज नसल्याचा निर्वाळा देऊन शस्त्रक्रिया करण्याचे मुळीच कारण नाही असा आपला अभिप्राय दिला."

माधवरावाना बाबांचे नेहमीचे शब्द आठवू लागले.

बाबा नेहमी म्हणत, "अरे, घर ना दार असा मी एक फाटका फकीर. सर्व टाकून या उघड्या माळावर येऊन बसलो. पण ती सटवी माया येथेही येऊन मला छळतेच रे!

आदिमायाच ती! ब्रह्मादिकांची सुद्धा त्रेधा-तिरपीट उडविणारी ती! तिच्या पुढे माझ्यासारख्या दुबळ्या फकिराचे काय चालणार! पण असो. हरीच जेव्हा प्रसन्न होईल तेव्हाच हा ताप दूर होणार! तोपर्यंत त्या हरीला अहोरात्र हाका मारण्याविना आपल्या हाती दुसरे काय आहे?"

लोकांचे लक्ष विषयसुखावरून उडवून त्याना हरिभजनी चिकटविण्याची बाबांची युक्ती म्हणजे तर हे व्याधिनाशन नव्हे! जीवनाचे मोल मृत्यूच्या दारात पटविण्याची ही नामी युक्ती तर नव्हे! प्रिय पुत्राचा मृत्यू होण्यापेक्षा त्याने संन्यास घेतला तरी चालेल असे म्हणणाऱ्या आद्य श्रीशंकराचार्यांच्या मातेच्या मनाचे हे प्रतिबिंब तर नव्हे!

तसे नसते तर बाबांनी पूर्ण मौनच पाळले असते. पण तसे मौन ते पाळत नाहीत. उलट प्रत्येक भक्तास विशेषतः प्रत्येक व्याधिमुक्तास उदीप्रसाद देऊन निरोप देताना म्हणतात, "जा! तुझ्यावर अल्लाची कुदरत झाली. तुझे पाप जळाले. आता तू माझा झालास. तुला भीती नाही."

जळालेल्या पापाची खूण म्हणजे बाबांच्या हातीची ती चिमुटभर उदी! ती उदी जोपर्यंत जवळ आहे तोपर्यंत भक्तास दिलासा आहे. जणू या उदीमधून अणुरेणू व्यापून उरलेले बाबा म्हणत आहेत, "माझे अनन्य चिंतन कर की मी तुम्हाजवळच आहे. पूजेच्या बडिवारापेक्षा तुझा तो साधा, सरळ, भोळा भावच मला अधिक प्रिय आहे."

* *

# श्रीसाईबाबा

सौ. माधुरी कुलकर्णी (सातारा)

शिरडी गावात लिंबाच्या झाडाखाली सुंदर बाल स्वरुपात एक तेजस्वी मूर्ती एके दिवशी अचानक लोकांच्या दृष्टीस पडली. हे असामान्य बालक आजा अचानक येथे कोठून आले म्हणून जो तो आश्चर्य करू लागले. रात्रंदिवस ते बालक लिंबाच्या झाडाखाली ध्यानस्थ बसून राहू लागलेले पाहून तर लोकांचे आश्चर्य द्विगुणितच झाले. लोकांच्या मनात त्या बालकाबद्दल कुतुहल आदर व प्रेम निर्माण झाले हेच ते साईबाबा होय.

पुढे काही दिवस बाबा गुप्त झाले होते. पुढे औरंगाबाद जिल्ह्यात चाँद पाटलांचे घोडेहरवले ते तो शोधित असताना त्याला एकदम बाबा दिसले नंतर एका मुसलमानाच्या वऱ्हाडा बरोबर ते पुन्हा शिरडीत प्रकट झाले.

साईबाबांचा जन्म कोठे झाला, केव्हा झाला कोणाच्या पोटी झाला ते जातीने कोण हिंदू का मुसलमान काही कोणाला कशाचा अद्याप पत्ता लागला नाही. ते मशीदीत राहात. देवळात ऊठत बसत. त्यांनी मशीदी बांधल्या त्याचप्रमाणे अनेक देवळेही बांधली. त्यांचा जिर्णोद्धार केला ते मशिदीत दिवे लावत तसेच देवळातूनही दिवे लावत. हिन्दू मुसलमानाप्रमाणे, ख्रिश्चन पारशी इत्यादी अनेक जमातीतील लोक त्यांचे भक्त आहेत. शिरडीत उरस भरतो तसा रामनवमीचा ऊत्सवही मोठ्या प्रमाणात साजरा होत असतो. "अल्लामालिक" हे वाक्य बाबांच्या तोंडात सारखे बोळत असे. तर "ॐ नमो शिवाय" हा त्यांचा मंत्र होता. भगद्वतगीता,- ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत इत्यादी हिंदू धर्माचे ग्रंथ ते आपल्या भक्तांना वाचा- वयास लावीत. त्यांची सामुदायिक पारायणे करवीत लोकांना ती ऐकावयास लावीत.

स्वतः त्यातील कथा लोकांना समजावून सांगत त्यावर विवेचन करीत ते ग्रंथ लोकांना भेटीदाखल देत.

साईबाबा शिरडीला आले तेव्हा ते फाटक्या कपड्यात असत कधी पूर्वीच्या लिंबाच्या झाडाखाली जाऊन बसत. कधी मळ्यात बसत तर कधी ओढ्यावर जात. याप्रमाणे ते इकडे तिकडे स्वैरपणे हिंडत. लोकांना ते वेडेच वाटत पुढे मग ते आताच्या (द्वारकामाई) मशिदीत स्थिराव्ू लागले व रात्री झोपावयास मशिदीतच येऊ लागले.

पायघोळ कफनी, डोक्यास फडका, काखेत सटका एका हातात टमरेल, दुसऱ्या हातात झोळी, पायात काही नाही अशा वेषामध्ये बाबा गावात लहर लागेल तेव्हा वेळी अवेळी विदेही स्थितीत भिक्षेसाठी हिंडत असत. भिक्षा मागून

आणलेले अन्न ते गोरगरीबाना देत असत. अनेकदा मशिदीत स्वहस्ते अन्न शिजवून भुकेलेल्याना ते वाटीत. कित्येकजण दक्षिणार्थ पैसे बाबांना देत तेही गरीबाना वाटून टाकीत असत. उरलेल्या पैशाची फळे वगैरे घेऊन लोकांना वाटीत. गरीबांविषयी त्यांच्या मनात अत्यंत जिव्हाळा प्रेम, होते. आजाऱ्यांना सुद्धा बाबा औषध वगैरे देत असत. पण त्याचे पैसे कोणाकडून घेत नसत ते स्वतः आजाऱ्यांची सेवा करीत.

बाबांना देवळात व मशिदीत दिवे लावण्याचा अतिशय नाद होता. त्यासाठी ते लोकांच्याकडून तेल मागून आणीत. एकदा कंटाळून दुकानदारांनी त्यांना तेल दिले नाही तेव्हा बाबांनी पणत्यात पाणी घालून वाती पेटविल्या. असे अनेक चमत्कार त्यांनी आपल्या भक्तमंडळीना करून दाखविले. कित्येक हिंदूना बाबा मुसल्मान वाटत व ते त्यांचे दर्शनास जायला कबूल नसत. अशांना बाबांनी कोणी रामभक्त असतील त्याना रामाच्या स्वरुपात दर्शन दिले. विठ्ठल भक्तांना विठ्ठलाच्या स्वरुपात दर्शन दिले. व त्यांना आपलेसे करून घेतले. अशा तऱ्हेने त्यांनी लोकाना भक्तीस लावले.

* *

# श्रीसाईस्तुती

ऐहिक सुखाची
सुरली आसक्ति
जडली रे भक्ति
तुजवरी ॥

विसरूनी जाता
सारे गणगोत
साई भगवंत
गवसला ॥

शक्तिने मजला
दिले आत्मज्ञान
झाले पंचप्राण
साईरूप ॥

प्रतिभेची ज्योत
तेजाळली आत
भक्ति दिनरात
करताना ॥

साईंच्या नामाची
लागताचि गोडी
सुटली गा कोडी
जीवनाची ॥

साईंच्या कथांचे
गवसले धन
जाहलो राजन्
आत्मानंदी ॥

—अरुण पुजारी
गणेशपुरी (ठाणे)

## " साईलीला " सत्य

अडकलें मन
संसार – जंजाळी
नाही आठवित
' साई ' नामावली.
ध्यानीं नसे देव
ना नसे देव
' अर्था ' साठी सारे
जीवन घे धांव
स्तोत्र पाठ पूजा
केली नाही नित्य
पटे मनीं – अंतरीं
" साईलीला " सत्य

— विजय द. हजारे.

## साई–पूजन

ॐकार गणेश साई महाराज।
भक्तिच्या दुर्वा वाहतो आज॥
सांब सदाशिव साई महाराज।
भावाचा अभिषेक करतो आज॥
आई जगदंबा साई महाराज।
संतोष सुमने वाहतो आज॥
दत्त दिगंबर साई महाराज।
श्रद्धेची माधुकरी घालतो आज॥
भोळा विठ्ठल साई महाराज।
प्रेमाच्या तुळसी वाहतो आज॥
राई रखुमाई साई महाराज।
निष्ठेचा नैवेद्य ठेवतो आज॥
गुरुमाऊली साई महाराज।
कृपेचा प्रसाद मागतो आज॥

—सौ. मंगला अ. जावळे

# राउळ गाठिन खास

मम कंठामधुनी एकच गीत स्फुरावें,
कीं ज्यातुन मजला, प्रभुचें गूढ उकलावें ॥ ध्रु ॥

हे अखिल विश्व जणुं, सुंदर बगीचा एक
संथपणें वाहे, वायु, अनाहुत त्यांत,
परि एक उमटतो, ध्वनी विलक्षण मात्र,
आकर्षुन घेतो, अवचित चित्त तयांत,
विचलीत क्षणभरी, श्रवणीं भाव हरावें । कीं ज्यातुन... ॥ १ ॥

वादळीं वायुही, मंद मधुर ध्वनि काढी,
तो विश्वविणेच्या, साऱ्या तारा छेडी,
दृष्यमान सृष्टि, गीत गात तंद्रीत
निःशब्द सुरानें, आळवित ती अनंत,
त्या सुस्वर गानीं, मी ही तल्लीन व्हावें । कीं ज्यातुन ॥ २ ॥

त्या गीतामाजी, लुब्ध मुग्ध होउनिया,
त्या अतर्क्यतेचे, लागे गान वदाया,
एकात्म होउनी, पूर्ण तया प्रकृतीला,
गायिले अभंगा, गुंग होऊनी तिजला,
गुणगुणले त्याचा, अर्थ न मजला ठावें । कीं ज्यातुन... ॥ ३ ॥

ही निसर्ग-शक्ती, ठेवि नियंत्रण नामी,
यंत्रणेंत जीणें, परम सौख्य मन मानी,
मुंगीला उमगे, वारूळाची वाट,
मी अनंततचे, 'राउळ' गाठिन खास,
पाउलें हळुंहळुं, उचलित मीहि चलावें । कीं ज्यातुन... ॥ ४ ॥

— लक्ष्मीतनया

# ॐ साईबाबा

थोर मनाचे अनंत गुणांचे शिरडीचे राजे
साईनाथ माझे बाबा साईनाथ ॥ थोर ॥

अति दयाळू अति कृपाळू कनवाळू बाबा
शरणांगती अभय देती माझे साईबाबा माझे ॥ थोर ॥

ठेवा श्रद्धा धरा सबूरी करा नित्य सेवा
चमत्कार दाखवतील पहा माझे साईबाबा ॥ थोर ॥

उदी पवित्र चरणतीर्थ हे रोज सेवन करा
साईबाबांचे नामस्मरण नित्य नेमेस्मरा ॥ थोर ॥

अति पवित्र अति पावन बाबांचे नाम
नित्य नेमें स्मरता होईल जिवनाचे काम ॥ थोर ॥

ॐ साईबाबा मंत्र नित्य हा जपा
होईल पहा मग श्रीसाईबाबांची कृपा ॥ थोर ॥

अनमोल अति अनमोल हा सुखाचा ठेवा
नित्य सुखी असु द्या हा भक्तिचा मेवा ॥ थोर ॥

अति सोपे अति साधे हे भक्तिचे साधन
शुद्ध मनानें करींता होईल मोक्षाचे साधन ॥ थोर ॥

हात जोडूनी मागतो बाबा एकच वरदान
जन्मोजन्मी मनी वसावे आपुलेच ध्यान ॥ थोर ॥

—वसंत मनोरे, पनवेल

# — मनोरथ —

(गुरुवर्य श्रीमत् भगवान परमहंस परिव्राजकाचार्य
सद्गुरु श्री. श्रीधरस्वामी–चरणी)

मनोरथाचे घोडे । आकाशी उडती वेडे
दिसतां वरदखेडे । वायूवेगे येती खाली ॥ १ ॥

गोपद चिन्हे रेखीव । त्या भूमिचे वैभव
स्वागता वृक्ष पल्लव । नाचतो पवन तालीं ॥ २ ॥

भूस्पर्श होता पदाला । मनोदेह मोहरला
भरते ये वात्सल्याला । प्रसन्न गुरु माऊली ॥ ३ ॥

श्रीधरांचे तेज; कण । भक्त हृदयी उधाण
अमृताची पखरण । मिळे मायेची सांवली ॥ ४ ॥

गुरु उच्छ्वास मंगल । सुपवित्र परिमल
पवन वाहे शीतल । सुजन भाग्यशाली ॥ ५ ॥

मन जाहले व्याकूळ । मनाचा झाडूनी मळ
गुरु माते तव बाळ । आले वरदपुरीं ॥ ६ ॥

रथ उभा ग्राम काठी । मन शोधे गुरु कुटी
उंच शिखरी एकटी । ॐकारीं प्रगटली ॥ ७ ॥

श्रीधर तीर्थ निर्मळ । करा भक्तिची ओंजळ
देह होतसे सोज्वळ । कृपेन्दू–करकमळी ॥ ८ ॥

घेता गणेश दर्शन । हिंदोलत नागासन
हंसले विश्वनर्तन । नागासनी सुमावली ॥ ९ ॥

दर्शना भासे तृप्तांश । माऊलीचा जयघोष
द्वैताचा टाकुनी वेश । सत्यवाणी गर्जली ॥ १० ॥

मन निघाले सासरी । कृपामृत करा–करी ?
अस्फुट शब्द अधरी । गुरुमाता आसवली ॥ ११ ॥

कर्तव्याचे सासर । ममतेचे माहेर
मन निघे रथावर । कर्म जागृति पटली ॥ १२ ॥

देहांतरी आत्माराम । शिष्य, गुरूंचा आश्रम
सदैव करी विश्राम । देहकुटी तेजाळली ॥ १३ ॥

सेविका—सौ. मीना पां. खाडिलकर
सांगली.

# सर्वदेवता-स्वरूप श्रीसाईनाथांचा गोड-सहवास

तुझ्याच हाती जीवन माझे
पामर मी तव दास।
ठेविशील तू तसाच राहिन
घट्ट धरूनि तव कास ॥ १ ॥
तुझ्याच पायी नम्र होऊनि
करीन मी नमनास।
सुखःदुखाचे बंधन सोडुनि
धरिन तुझाच मी ध्यास ॥ २ ॥
तुझ्याच साठी देह झिजऊनि
लाविन भक्ती पणास।
अखंड लाभो कृपा तुझी अन्
गोड तुझा सहवास ॥ ३ ॥

— शाम जुवळे

# साईनाम नौका

ही साईनाम नौका भवसागरी तराया
मद मोह लोभ सुसरी किती डंखीतां विषारी।
ते दुखः शांतवाया मांत्रिक साईराया ॥१॥
सुटले अफाट वारे मन तारू त्यांत थिथरे।
त्या वादळातूनिया नेईल साईराया ॥२॥
भ्रम भोवऱ्यांत अडली नौका परी न बुडलीं।
धरूनी सुकाणु हाती बसलेस साईराया ॥३॥
आम्ही सर्व ही प्रवाशी जाणार दूरदेशी।
तो मार्ग दाखवाया अधिकारी साईराया ॥४॥

—सौ. विमलादेवी, नागपूर

# इंद्रायणीमाय

इंद्रायणींमास माझी तू बहिण
कागदाचीं पानें रक्षियेली ॥१॥
माझी तूं भगिनी अनन्त युगाची
दिली मज खेव मातेपरीं ॥२॥
तुझी जलचरे माझे ते सोयरे
अभंग रक्षिलीं अक्षरें तीं ॥३॥
पांडुरंग ध्वनी जलीं उमटतां
झाले जलचर ब्रह्मज्ञानी ॥४॥
आजहीं तिथेच तुकोबाचा वास
वैकुंठ पाषाण जलांतले ॥५॥

—श्री. तु. नाईक, एम्. ए.

# गा रे साईनाम।

वैकुंठाविण दुजे न कुठले परम सुखाचे धाम
वाट चाल ही भक्तिचीं तूं गात साईंचे नाम ॥ध्रु॥
वेड लाविते नश्वर माया
वस्त्रासम ही नश्वर काया
साईनाम हे मुखी रंगता विसरून जाते भान
वाट चाल ही भक्तिची ॥१॥
साई नामेरे रंगुन जावे
साईरूप हे जीवन व्हावे
पिऊन भक्ति साई शमवी आपुली नित्य तहान
वाट चाल ही भक्तिची ॥२॥
संत भेटती या वाटेवर
भजन चालते इथे निरंतर
हरिभक्ताला अंती लाभतो मोक्षाचा सन्मान
वाट चाल ही भक्तिची ॥३॥

—जयंत भिडे

# दीनांचा कैवारी

दीनांचा कैवारी आला जणु गिरिधारी !
संत निवासे क्षणात पावन झाली शिरडी नगरी !

जुनी पुराणी अंगी कफनी
चालतसे यात्रिक अनवाणी
पुसे आसवे दुःखिजनांची, करुणा ही तनुधारी ! ॥ १ ॥

अन्न आणतो, जनां वाटतो
पाणी पिवूनी भूक शमवितो
हात घेऊनी उशास पहुडे शेषावरी मुरारी ! ॥ २ ॥

जन जीर म्हणती वेडा याला
संतपणा दिसतो न जगाला
माणुस कसला, देव अवतरे हिंडे दारोदारी ! ॥ ३ ॥

मशीद पडकी प्यारी झाली
कोपऱ्यात मग स्वारी लेटली
तिथेच चिंतन करि विश्वाचे साईंजींची स्वारी ! ॥ ४ ॥

— श्रीराम आठवले

# नामे विविध धारी

भक्तरक्षण्या सदा अवतरे मुरलीधर श्रीहरी
वेष पालटे, युगायुगांतरी, नामें विविध धारी ॥ध्रु॥

सत्ययुगीचा राम तोच हा, अहिल्याउद्धारी
दंड रावणा देऊनि मुनिजना विघ्नमुक्त तो करी ॥ १ ॥

द्वापारीचा कृष्ण - कन्हैया, गोकुळचा गिरीधारी
पुरवी वस्त्रे द्रौपदीस अन् सुदाम्यासी तारी ॥ २ ॥

जनाई, मुक्ताई, तुकयासंगे कष्ट झेलीत उरी
विठ्ठल होऊनी दंग जाहला चंद्रभागेतीरी ॥ ३ ॥

कलीयुगी 'श्रीसाई' बनुनी फिरतो दारोदारी
'फकीर' वेषे श्रीसद्गुरु हा रूप नवे दावी ॥ ४ ॥

हा परमात्मा, ओंकाररूप हा, निर्गुण निराकार ह्याची
तोच विष्णु, शंकर शंभु, ब्रह्म ही तोची ! ॥ ५ ॥

विश्व रक्षण्या सगुण साकार, रूप नवे धारी
वेष पालटे, युगांयुगांतरी, नामे विविध धारी ॥ ६ ॥

— श्रीधर प्रभुणे

# स्वप्नीचे साईनाथ

(चाल : ब्रह्मा विष्णू आणि महेश्वर सामोरी बसले – मला हे दत्तगुरु दिसले.)

स्वप्नी जेव्हां शिरडी गेले
अघटीतची घडले
मला श्री साईनाथ दिसले ॥ ध्रु ॥

प्रसन्न मुद्रा त्यांची पाहुनी
मस्तक नमले त्यांच्या चरणी
भक्तीभावे पूजा अर्पूनी
आशिवार्दा इच्छीले
मला श्री साईनाथ दिसले ॥ १ ॥

मानसीच्या साऱ्या चिंता
कथन मी केल्या साईनाथा
तुम्हीच अपुल्या तारा भक्तां
साश्रूनयन वदले
मला श्री साईनाथ दिसले ॥ २ ॥

प्रभात झाली मांगल्याने
स्वप्न माझे पूरे जाहले
साई वेडे मन हे माझे
वदतची हो राहीले
मला श्री साईनाथ दिसले ॥ ३ ॥

—स्नेहल रा. गुप्ते.

# शिरडीवृत्त – मार्च १९७५

या महिन्यात शिरडीस श्रींचे दर्शनाकरिता बाहेरगावची साईभक्त मंडळी बहुसंख्येने आली होती. बुधवार दि. २६–३–७५ ते रविवार दि. ३०–३–७५ पर्यंत जोडून सुट्या होत्या त्यामुळे यात्रेचे स्वरूप आले होते.

काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणेः—

**कीर्तन प्रवचन** १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली. २) श्री. तुकारामबुवा परदेशी, शिरडी ३) ह. भ. प. संत सीतादेवी कोळंबेकर, जळगाव. ४) ह. भ. प. श्रीमती जानकीबाई डंगळे, गोरेगाव मुंबई. ५) ह. भ. प. लक्ष्मण महादेव रणदिवे, मुंबई दादर. ६) ह. भ. प. जगन्नाथ विठ्ठल वाघचौरे शिरडी. ७) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिरडी.

**भजन, गायन, वादन वगैरे** :–१) श्री. संगीतरत्न नन्हेबाबू माणिकनगर २) कु. नीलिमा श्री नागेशकर, ग्रँटरोड, मुंबई. ३) श्री. एच. एन. त्रिवेदी, बंगलोर. ४) श्री. विजयराज कन्नडकर, नासिक. ५) श्री. राजाराम दि. एडवणकर, ठाणे, ६) श्री. विपुलराव अ. कुलेंकर, गोरेगाव मुंबई ७) ह. भ. प. विजयबाबा धंतोली नागपूर ८) ह. भ. प. स्वामी रामानंद, बेळगाव ९) श्री. वी. सत्यनारायण, सिकंदराबाद १०) कु. निर्मला धनसिंग स्वामी, पुणे.

**माननीय श्रीमान शंकररावजी चव्हाण मुख्य मंत्री यांची शिरडीस भेट**

माननीय श्रीमान शंकररावजी चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी दि. २३–३–७५ रोजी शिरडीस भेट दिली. सकाळी १०–३० वाजता श्रीसाईबाबांचे मंदिराजवळ आल्यावर मंगलवाद्ये वाजविणेत आली. माननीय श्री. पारेखसाहेब सी. टी. सिव्हील कोर्ट जज्ज मुंबई व माननीय श्री. का. सी. पाठकसाहेब रिसीव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले. त्यानंतर सन्माननीय नागरीक व पाहुणे मंडळी यांनी हार घातल्यावर सुवासिनींनी ओवाळले.

मंदिरात आल्यावर सकाळी १०–३० ते ११ वाजेपर्यंत त्यांनी श्रीसाईबाबांची मनोभावे अभिषेक पूजा केली. सोबत राज्यमंत्री माननीय श्री. खताळ व प्रदेश कॉंग्रेस अध्यक्ष मा. श्री. पी. के. सावंत होते. धार्मिक पूजाविधी कार्यक्रमानंतर साईनिवास लेंडीबाग येथे उभारलेल्या भव्य मंडपात प्रवेश केला त्यावेळी स्वागतपर गीत गाऊन त्यांना मानवंदना देणेत आली. उपस्थित प्रचंड जनसमुदायापुढे भाषण करून महाशय मुख्यमंत्र्यांनी सांगितले, आपण करीत असलेल्या जनहिताच्या कार्यात श्रीसाईबाबा यश देतील. कार्यक्रम झाल्यावर श्रीसाईबाबांचे आरतीला उपस्थित राहून दुपारी १२–४५ ला शिर्डीहून प्रयाण केले.

**रंगपंचमी :–** सालाबादप्रमाणे श्रींच्या रथाची मिरवणूक सायंकाळी रंगपंचमीचे दिवशी गावातून ५ ते ६-४५ पर्यंत निघाली होती.

माननीयांच्या भेटी :–

१) मा. श्री. पद्मनाभय्या जिल्हाधिकारी नासिक

२) मा. श्री. बी. एन. आडारकर, चेअरमन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवाहन मारमंडळ मुंबई.

३) मा. श्री. डी. आर. चव्हाण, डे. जनरल मॅनेजर म. प. महामंडळ मुंबई

४) मा. श्री. रणदिवे, असि. चॅरिटी कमिशनर पुणे.

५) मा. श्री. डी. एन. चौधरी, डे. चॅरिटी कमिशनर मुंबई.

६) मा. श्री. विलासराव पाटील, उपजिल्हाधिकारी अ. नगर.

७) मा. श्री. पारेखसाहेब जज्ज, सिटी सिव्हील कोर्ट मुंबई.

८) मा. श्री. नाडकर्णी, जज्ज सिटी सिव्हील कोर्ट मुंबई.

९) मा. श्री. टी. आर. देसाई जज्ज, सिटी सिव्हील अॅण्ड सेशन कोर्ट मुंबई.

१०) मा. श्री. के. एन. शेनॉय जनरल मॅनेजर फर्थ इंडिया स्टील कंपनी, ठाणा.

**हवापाणी :–** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

## श्रीसाईलीला

### जून ७५ अंकाची झलक

- " इन्नलाहा अल्ला कुले शौइन खदीर " नागपूरचे विख्यात डॉ. अनिल यांचा श्रीसाईबाबांचे वरील खास अनुभव लेख
- " प्रेमी भक्त बिल्व मंगल " डॉ. के. भ. गव्हाणकर यांचा वाचनीय लेख
- दहीसरच्या श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटरचे संचालक श्री. बी. आर. काकडे यांनी पाठविलेली " श्रीसाई भेट "
- श्री. विनायक पाठक यांचा " पद्मावतकार जायसी " हा माहितीपूर्ण लेख.
- श्री. द. शं. टिपणीस यांनी अर्वाचीन भक्ती लीलामृत अध्याय ३२ वर केलेले विवेचन.
- श्री. र. श्री. पुजारी यांची चालू श्रीसाईनाथ लेखमाला.
- होरालंकार शं. वा. देवधर यांचा हर्षल वरील लेख या शिवाय सौ. सुशिलाबाई हजारे, सूर्यकांत गर्जे, श्री. तु. नाईक डी. डी. पोतनीस नरेंद्र कृष्ण, बसंत मनोरे, लक्ष्मी तनया, रा. मा. आडकर इ. च्या भावमधुर कविता.

## श्रीसाईमंदिरे व

# प्रसिद्ध साईसमाजांचे पत्ते

(१) ऑल इंडिया साई समाज, मेलापूर, मद्रास ६०००६
(२) श्रीसाईबाबा मंदिर, कुर्नूल, आंध्रप्रदेश.
(३) श्रीसाईबाबा मंदिर, पो. काकिनाडा, आंध्रप्रदेश.
(४) श्रीनागसाईमंदिर, श्री साईबाबामंदिर रोड, पो. कोईमतूर तामीळनाडू.
(५) श्रीसाईबाबामंदिर, पो. कडाप्पा, आंध्रप्रदेश
(६) श्रीसाईबाबामंदिर, पो. भीमावरम, जि. पश्चिमगोदावरी आंध्रप्रदेश.
(७) श्रीसाईमंदिर, पो. दावलईश्वरम, राजमहेंद्री, आंध्रप्रदेश.
(८) श्रीसाईमंदिर, पो. जलालपेट बंदर, मच्छलीपट्टनम, आंध्रप्रदेश,
(९) श्री प्रसन्न साईमंदिर, ७४ त्यागराज रोड, म्हैसूर कर्नाटक.
(१०) श्रीसाईमंदिर, फर्नहिल, निलगिरीज; उटकमंड जि. कोइमतूर, तामीळनाडू.
(११) श्रीसाईबाबा मिशन, पो. कोइमतूर, केरळ.
(१२) श्रीसाईबाबामंदिर, पो. रंगावरम, विजयवाडा, आंध्रप्रदेश.
(१३) श्रीसाईबाबामंदिर, पिकेटस पो. सिकंदराबाद.
(१४) श्रीसाईबाबामंदिर, पो. कणेगिरी, जि. नेलोर, आंध्रप्रदेश.
(१५) श्रीसाईबाबामंदिर; पो. चिन्मगंजम जि. गुंतूर (आंध्रप्रदेश)
(१६) श्रीसाईबाबामंदिर, पो. रायपल्ली जि. गुंतूर ( ,, ,, )
(१७) श्रीसाईबाबामंदिर, बोसरोड, स्वराज्य टॉकीज जवळ, पो. तेनाली (आंध्रप्रदेश)
(१८) श्रीसाईबाबामंदिर, (हिंदुस्थान बाबा) पो. बळजू जि. काठमांडू नेपाळ.
(१९) श्रीसाईबाबामंदिर, पो. रंगपू सिकिम.
(२०) श्रीसाईबाबामंदिर, पो. समची, भूतान.
(२१) श्रीसाईश्याम निलयम, पो. पंचमढी, (मध्यप्रदेश)

# श्रीसाईबाबा फौंडेशन

भगवान श्रीसाईबाबांच्या नावाने एक फाउंडेशन श्री साईबाबांच्या पन्नासाव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने म्हणजे १९६८ साली स्थापन करण्यात आली आहे.

श्रीसाईबाबांनी आपले जीवन गरीबीने व कोणत्याही प्रकारे गाजावाजा न करता केवळ इतरेजनांच्या कल्याणार्थ घालविले. शिर्डीसारख्या एका आडबाजूच्या खेड्यात वास्तव्य करून आपल्या कार्याचा गाजावाजा होऊ न देता लोककल्याणाच्या दृष्टीने त्यांनी नाना लीला व चमत्कार केले व ते केवळ जनता भक्तीमार्गाकडे वळावी या हेतूने. बाबांनी कोणत्याही धर्माच्या बाबतीत भेदभाव मानला नाही. सर्वधर्म समानत्व हेच त्यांचे जीवनतत्त्व होते. बाबा शिक्षणाला फार महत्त्व देत तसेच दीन-दुःखितांना रोग-पीडीताना औषधोपचार करण्यात, त्यांची सेवा करण्यात ते स्वतःला धन्य समजत. जनतेतील दैन्य व दारिद्र्य दुर करण्यासाठी झटणे हे पण त्यांचे एक ध्येय होते. बाबांचे शिरडी येथे जे जीवनकार्य पार पडले व हे जे केवळ जनतेच्या कल्याणासाठी होते ते त्यांचे कार्य पुढेही सतत चालू राहिले पाहिजे, त्यांचे कायम स्मारक त्या दृष्टीने करण्यात आले पाहिजे व याच सद्हेतूने साईबाबा फौंडेशन स्थापन करण्यात आली आहे.

## श्री साईबाबा फौंडेशन - विश्वस्त मंडळ


**अध्यक्ष**

श्री. शेषराव के. वानखेडे - विधान सभापती, महाराष्ट्र राज्य.

**सदस्य**

१) श्री. शंकरराव चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
२) श्री. विठ्ठलराव पागे, सभापती विधान परिषद.
३) श्री. बाळासाहेब भारदे, उपाध्यक्ष, खादी ॲन्ड व्हिलेज इन्डस्ट्रीज महामंडळ
४) श्री. बाळासाहेब सावंत, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमेटी.
५) श्री. वी. पी. दलाल, सचिव, कायदा व न्यायखाते, सचिवालय, मुंबई.
६) श्री. चंद्रकांत गोडसे, माजी धर्मादाय आयुक्त.
७) श्री. एम. डी. कांबळी, जिल्हा न्यायाधीश, महाराष्ट्र राज्य मुंबई.
८) श्री. धारणे, धर्मदाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई
९) श्री. का. सी. पाठक, रिसीव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी.

# साक्षात्काराची ओळख

साक्षात्कार म्हटला की तो परमेश्वराचाच, हे सांगायला नकोच. पण परमेश्वर म्हणजे कोणता ? हे स्पष्ट होण्याकरता परमेश्वर या शब्दाने सूचित होणारा जो त्या अभिप्रेत परमेश्वरासंबंधी एक दोन मूलग्राही सिद्धांतवजा वचने उद्धृत करतो.

(१) अनुमान, आप्तवाक्य, श्रद्धा आणि अनुभव या चतुर्विध भक्कम आधारावर परमेश्वराचे अस्तित्व निर्विवादपणे सिद्ध करता येते, असा जो परमेश्वर तो.

.(२) जागृती स्वप्न आणि सुषुप्ती तिन्ही व्यापुनी समाधीही परती ज्याची साक्षित्वे स्फुरे स्फूर्ती स्फुर्ती तो जाण निश्चिती नारायण परमेश्वराच्या अस्तित्वासंबंधात ऊहापोह करण्याचे हे स्थळ नाही. म्हणून आपण आता पुढे सरकु या.

आता साक्षात्कार म्हणसे काय याची यथार्थ कल्पना देतो. साक्षात्कार हा लक्षावधी मानवातून एखाद्याच महामानवाला, वा संत–महात्म्याला उपरोक्त परमेश्वराचा अंशात्मक असा, अल्पकाल टिकणारा असा येणारा अनुभव. हा अनुभव कोणाला दृष्टांतरूपाने येतो, कोणाला त्याचे समूर्त दर्शन होते, कोणाला त्याचा नाद ऐकू येतो. अशा निरनिराळ्या प्रकारांनी तो येतो पुढे असेच अनुभव सारांशरुपाने कथन केले आहेत. साक्षात्काराचे अनुभव सांगण्याच्या अगोदर, साक्षात्काराचे अनुपमेय महत्त्व सांगतो. साक्षात्कार हे मानवी जीवनाचे सर्वोच्च ध्येय आहे. या ध्येयाच्या तुलनेत, मानवाने आजतागायत केलेले सर्व पराक्रम, मग ते कोणच्याही क्षेत्रातले असोत, ज्ञान–विज्ञानातले, अणु संशोधनातले वगैरे वगैरे सर्व गौण आहेत. जगाचे कल्याण या संशोधनांनी होईलच असे छातीठोकपणे सांगता येणार नाही. हाँ ! जगाचा विनाश करता येईल. अहो ! एखाद्याच प्रचंड बॉंबस्फोटाने आखी मुंबई जमीनदोस्त करता येईल. येथून पुढे आता साक्षात्कार कोणाला होतो व तो कसा होतो या संबंधातील वचने उद्धृत करतो.

(१) जोपर्यंत अहंकार समूळ नष्ट होत नाही तोपर्यंत साक्षात्कार होत नाही.

(२) विशुद्ध–परमशुद्ध झालेल्या अंतःकरणात परमात्म्याचे प्रतिबिंब दिसते.

(३) परमात्म्याचा साक्षात्कार इंद्रियातीत अवस्थेत गेल्यावर होतो.

(४) आत्म्यानेच परमात्मा जाणता येतो. सूक्ष्मानेच सूक्ष्माची ओळख पटे.

(५) आत्मा व ब्रह्म यांच्या ऐक्याचा अनुभव यालाच साक्षात्कार म्हणतात.

(६) परमश्रेष्ठ भक्तांना तो त्यांच्या त्यांच्या उपासनेप्रमाणे, दर्शन देतो. भाव तसा देव.

(७) सारांशरूपाने असे सांगता येईल की, साक्षात्काराचा अनुभव यायला मनुष्य स्थितप्रज्ञ व्हावा लागतो.

(८) त्याचप्रमाचे साकल्याने विचार करता, परमात्मा सत्–चित् आनंद-स्वरूप आहे.

(९) कोणाला तो ज्योती–बिंदू स्वरूप दिसतो.

(१०) लक्षात ठेवण्याची महत्वाची गोष्ट ही आहे की, कोणालाही साक्षात्काराचा पौर्णिमेचा चंद्र पाहता येत नाही. त्याचे दर्शन, श्रवण वगैरे सर्व गोष्टी अंशात्मकच असतात.

(११) अनाहूतध्वनी ऐकू येणे ही ईश्वरी साक्षात्काराची पूर्व खूण आहे असे कोणी म्हणतात.

(१२) महायोगी अरविंद म्हणतात सभोवताली काळोख दाटून येत असे, आणि अशाच एखादे वेळीं प्रश्नाची उकल करणारा प्रकाश डोळ्यांपुढे सरकून जात असे.

गीतेतील ओव्या उद्धृत करून ही ओळख संपवितो.

(१) प्राणीमात्राची–जी का स्वाभाविक चेतना ती देख–मीच आहे.

(२) सगूण साकार–भक्तियोगे प्राप्त निर्गुण अव्यक्त–योग–पंथ

(३) पार्था तैसा होता–माझा साक्षात्कार संपे येरझार–अहंतेची

संग्राहक...बाळकृष्ण सदाशिव घामणकर

## श्री साईबाबा संस्थान, शिरडीची प्रकाशने

श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित ( मराठी ) | रु. | ८·०० |
| २. | श्री साई सच्चरित ( इंग्रजी ) | रु. | ५·०० |
| ३. | श्री साई सच्चरित ( गुजराती ) | रु. | ४-५० |
| ४. | श्री साई सच्चरित ( हिंदी ) | रु. | ४·२५ |
| ५. | श्री साई सच्चरित ( कानडी ) | रु. | ४-२५ |
| ६ | श्री साईबाबा जीवितचरित्रम् ( तेलगू ) | रु. | ८·०० |
| ७. | श्री साईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि ( मराठी ) | रु. | ०-२० |
| ८. | दासगणूकृत ४ अध्याय ( मराठी ) | रु. | ०-२५ |
| ९. | सगुणोपासना ( मराठी किंवा गुजराती ) | रु. | ०-२० |
| १०. | श्री प्रधानकृत चरित्र ( इंग्रजी ) | रु. | १-०० |
| ११. | श्री साईलीलामृत ( मराठी ) | रु. | २-०० |
| १२. | श्री साईलीलामृत ( हिंदी ) | रु. | २-५० |
| १३. | सचित्र साईबाबा | रु. | १-०० |
| १४. | शीलधी ( मराठी ) | रु. | ०-२० |
| १५. | साईबाबा : अवतार कार्य ( अ. य. धोंड ) | रु. | १-७५ |
| १६. | शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा आल्बम ) | रु. | २-०० |
| १७. | श्री साईलीला मासिक ( मराठी किंवा इंग्रजी ) | | |
| | प्रत्येकी वार्षिक वर्गणी | रु. | ६-०० |
| | " किरकोळ अंकास- | रु. | ०·६० |
| १८. | मुलांचे साईबाबा ( द. दि. परचुरे ) ( मराठी ) | रु. | ०-५० |
| १९. | गुजराथी पोथी ( शरणानंद ) | रु. | ५-५० |

☆

**वरील प्रकाशनें मिळण्याची ठिकाणें :—**

१. व्यवस्थापक, श्रीसाईबाबा संस्थान, पोस्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, पिन :—४०० ०१४.

Regd. No. MH/BYE/26

# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १–५० | ८" × १०" | रु. ०·५० |
| १०" × १४" | रु. १–०० | २½" × ३½" | रु. ०–२० |
| ४½" × ५½" | रु. ०–३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. डी. डी. नेरॉय यांच्या ब्लॉकावरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिलेवर बसलेले बाबा | तीन रंगी | २५.५६ × ५०.८ | १–५० |
| २. शिलेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १–२५ |
| ३. शिलेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३३.०२ | ०–५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०–५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा अल्बम) | | | २–०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई-३१.

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक**, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.